नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १२५ * * अकोला * | शनिवार, दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## इमिग्रेशन क्षेत्रातून ब्रिटिश नागरिकाचे पलायन

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षेत मोठी चूक झाली आहे. एक ब्रिटिश नागरिक इमिग्रेशन क्षेत्रातून पळून गेला आहे आणि शहरात बेपत्ता आहे. हा ब्रिटिश नागरिक एअर इंडियाच्या विमान एआय ३३३ ने बँकॉकहून नवी दिल्लीला आला. त्याला थायलंडमार्गे युकेला पाठवण्यात येणार होते. तथापि, दिल्लीत, तो अधिकाऱ्यांना चुकवून इमिग्रेशन क्षेत्रातून पळून गेला.

ब्रिटीश नागरिकाचे नाव फिट्झ पॅट्रिक असे आहे. दिल्लीतील पोलिस आणि सुरक्षा एजन्सींनी ब्रिटीश नागरिकाचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. दिल्ली पोलिसांनी एफआयआर देखील दाखल केला आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# परमार्थी पार्थ

आजकाल नवी पिढी आपल्या बापाचेही ऐकत नाही, असे म्हणतात ते काही खोटे नाही. आता हेच पहा ना जगप्रसिद्ध पवार परिवाराचे अजुर्नाचे प्रतीकनाम असलेले पार्थ पवार हे थोडासा परमार्थ करायला गेले आणि बिचारे बिनकामाचे फसले. या बिचाऱ्याला म्हणजेच पार्थला मावळ मधून आजोबांनी तिकीट दिले होते तिथे त्यांचा घनघोर पराभव झाला. स्पष्टवक्तम् सदासुखी पिताश्री अजितदादा यांनी त्यांचा जातीने तेव्हा प्रचार केला होता. त्यानंतर त्यांच्या आईला म्हणजेच बारामतीच्या निवडणुकीत सुप्रियाताई जिंकल्यानंतर सुनेत्रा ताईंना, 'खास' दार खुले केल्यामुळे पार्थ पवार यांचे तेही दार बंद झाले आणि आता फुकटम् -फाकटम् विनाकारणची बदनामी पदरात पडली. महाराष्ट्राचे गेल्या काही वर्षात पर्मनंट असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार साहेबांना आधीच इतकी कामे आहेत की त्यांना आपला पार्थ असल्या धनुर्विद्येमध्ये इतका पारंगत आहे हे माहीतच नव्हते. एखाद्या मालमत्तेचा सौदा केला की मग तो ३०० चा असो की २०० चा असो, त्यातच देणारा खुश आहे आणि घेणाराही आहे खुश आहे. मग विनाकारण इतरांनी चोंबडेपणा करण्याची गरज काय. हा व्यवहार खुद्द त्यांच्या पिताश्रींनाच माहीत नाही, मग तो इतरांना कसा काय माहित होणार. याच पार्थरावांच्या पिताश्रींची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विनाकारण बदनामी केलेली होती हे खरेच आहे. त्यापूर्वी आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर त्याच्याही वरताण केली होती. पण जेव्हा उपमुख्यमंत्री यांच्या स्वच्छ कारभाराची आणि स्पष्ट वक्तेपणाची शाश्वती उपरोक्त दोघांनाही कळली, तेव्हा त्यांना अति आदराने सहाव्यांदा उपमुख्यमंत्री पद बहाल केले गेले. आता इतकी मोठी माणसे चारित्र्य प्रमाणपत्र देतात ते खरे नाही असे म्हणणारे नतद्रष्ट लोक कुंभीपाक नरकात जातील. याबद्दल आमच्या मनात अजिबात संशय नाही. आपल्या काकांचे बोट धरून राजकारण रुपी बोटीत चढताना जसे आपण परीट घडीचे स्वच्छ कपडे घालतो. तसेच स्वच्छ विचार दृष्टी आणि पारदर्शी कारभार करणाऱ्या अजित दादांना केवळ राजकीय सूडबुद्धीने लक्ष्य करणारे हे लक्षद्वीपी नेते आणि विनाकारण अजितदादांवर प्रश्नांची सरबत्ती करणारे पत्रकार यांना अजून अजित दादांची खरी ओळख पटलेलीच दिसत नाही. 'जनता म्हणजे देव, जनहिताची देवघेव. करण्या उभा सदैव महासागर' हे दैनिक महासागर जेव्हा सुरू झाला तेव्हापासून आमचे ब्रीदवाक्य होते. त्यामध्ये महासागर ऐवजी अजित पवार यांचे नाव टाकले म्हणजे अजित दादांचा खरा परिचय जनतेला नक्कीच होईल. बिचाऱ्या पार्थ पवारवर वार करताना त्या बिचाऱ्या निरपराध बालकाला किती मानसिक त्रास होत असतील. याची कल्पना करून तरी या क्रूर जगाने त्यांच्यावर दया दाखवणे गरजेचे होते. पण 'हा हंत आणि ही मंडळी त्या बिचाऱ्या संत बालकाचा किती अंत पाहणार', हे काही बरोबर नाही म्हणूनच आम्ही पार्थरावांच्या बाजूने आहोत. त्यांच्या चारित्र्याचे आणि चरित्राचे प्रमाणपत्र ज्याला आधुनिक भाषेत सर्टिफिकेट म्हणतात ते देण्यासाठीही तयार आहोत. पण ही आरोप करणारी निर्लज्ज मंडळी आपले आरोप मागे घेत नसतील तर, पार्थरावांनी त्यांच्यावरती बिनधास्त अब्रू नुकसानीचा खटला भरावा. शक्य असेल तर आम्ही साक्ष देऊ आणि त्यामुळेच भविष्यात त्यांनी वडिलांच्या पायावर पाय ठेवून अजित दादा यांचे उपमुख्यमंत्री पद मिळवावे, अशी आम्ही अपेक्षा करीत आहोत. अजित दादांनी आपले आशीर्वाद त्यांना निशंकपणे दिलेच असतील. किंबहुना ते द्यावेत, अशी आमची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मतचोरीनंतर जमीन चोरी

## एक तो लूट, कानूनी मुहर में भी छूट : पार्थ प्रकरणावर राहुल गांधींचा हल्लाबोल



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गंभीर आरोप करत राज्य सरकारवर थेट हल्ला चढवला आहे. राहुल गांधी यांनी दावा केला आहे की दलितांसाठी राखीव असलेली १८०० कोटी रुपयांची सरकारी जमीन केवळ ३०० कोटी रुपयांमध्ये पार्थ पवार यांच्या कंपनीला विकण्यात आली. या व्यवहारावर लागणारे स्टॅम्प ड्युटीचे शुल्क देखील माफ करण्यात आले असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी या प्रकाराला थेट जमीन चोरी असं नाव देत सरकारवर तीव्र टीका केली आहे.

राहुल गांधी पुढे म्हणाले की, ही केवळ जमीन चोरी नाही, तर ही त्या सरकारची ओळख आहे जी स्वतः मतदान चोरी करून सत्तेत आली आहे. या सरकारला ना लोकशाहीची किंमत आहे, ना जनतेच्या हक्कांची, आणि ना दलितांच्या अधिकारांची. त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही लक्ष्य केलं आणि विचारलं, मोदीजी, तुमची ही शांतता बरेच काही सांगते. तुम्ही शांत आहात कारण हे सरकार त्या लुटारूंच्या आधारावर उभे आहे, जी दलित आणि वंचितांचा हक्क हिसकावून घेत आहेत का?

### जो व्यवहार झाला तो रद्द आणि नोंदणीही रद्द...

**मुंबई :** मुंढवा कथित जमिन गैरव्यवहार प्रकरणी १ रूपयाचा देखील व्यवहार झालेला नाही. तसेच जो व्यवहार झाला होता तो देखील रदद करण्यात आला आहे. नोंदणी कार्यालयात प्रतिज्ञापत्र देऊन नोंदणी देखील रदद करण्यात आली आहे. ही जमिन सरकारी आहे. सरकारी जमिनीचा अशा प्रकारे व्यवहारच होउ शकत नाही. आता यात नोंदणी कोणी केली. व्यवहार कोणी केला. दबाव होता का, कोणाचा फोन होता का आदी सर्वच बाबींचा तपास करण्यासाठी महसूल, मुद्रांक व नोंदणी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली आहे. ही समिती येत्या महिन्याभरात आपला अहवाल सादर करणार आहे. त्यात दूध का दूध पानी का पानी होणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

अजित पवार म्हणाले, दिवसभरात मी या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली. मला हा व्यवहार झालेला माहितीच नव्हता. ही जमिन सरकारी जमिन आहे. या व्यवहारात १ रूपयाही देण्यात आलेला नाही. तसेच जो व्यवहार झाला होता तो देखील रदद करण्यात आला आहे.जर प्रकरणे बाहेर आली तर त्यांचीही चौकशी करावी. मग ती माझ्या कोणाही नातेवाईकाशी संबंधित असू देत, असेही ते म्हणाले.

# 'वंदे मातरम्' एक ऊर्जा!



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :**
राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' ला आज, शुक्रवारी १५० वर्षे पूर्ण झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये या निमित्ताने आयोजित सभेला संबोधित केले. पंतप्रधान म्हणाले, 'वंदे मातरम्' हा एक मंत्र, एक स्वप्न, एक संकल्प, एक ऊर्जा आहे. हे गाणे भारत मातेची पूजा आहे.

पंतप्रधान म्हणाले, वंदे मातरम ही भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा होती. ती प्रत्येक युगात प्रासंगिक आहे. १९३७ मध्ये, वंदे मातरमचा एक भाग काढून टाकण्यात आला. त्याचे तुकडे करण्यात आले. वंदे मातरमच्या विभाजनाने देशाच्या फाळणीचे बीज पेरले. ती फूट पाडणारी विचारसरणी आजही देशासाठी एक आव्हान आहे.

राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधानांनी एक टपाल तिकिट आणि एक नाणे प्रकाशित केले. त्यांनी वर्षभर चालणाऱ्या स्मारकाचे उद्घाटन केले आणि एक वेबसाइट लाँच केली. पंतप्रधानांनी वंदे मातरमच्या सामूहिक गायनातही भाग घेतला.

मोदी म्हणाले, आज, आपण आपल्या राष्ट्रीय गाण्याची १५० वर्षे साजरी करत असताना, ही आपल्या देशाच्या महान वीरांना श्रद्धांजली आहे. हा कार्यक्रम देशात एक वर्षासाठी चालेल.

## भारत घडविण्यासाठी वंदे मातरम्चा संकल्प करूया...



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंत्र्यलढ्यात सर्वांनी वंदे मातरम् म्हटले होते. वंदे मातरम् हा स्वातंत्र्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी वंदे मातरम् च्या सामूहिक गायनाने संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सामुहिक वंदे मातरम् गीत गायनप्रसंगी केले.

वंदे मातरम् गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक वंदे मातरम् गायनाचा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी मंत्री आशिष शेलार, मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा जोगळेकर यांच्यासह वरिष्ठ सनदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासोबत सर्व मान्यवरांनी एकत्र येऊन वंदे मातरमचे गायन करत राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### राजभवनात निनादले वंदे मातरम्चे सूर

वंदे मातरम् या गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त राजभवन येथे संपूर्ण 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ निशिकांत देशपांडे, एडीसी अभयसिंह देशमुख यांसह राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व जवानांनी 'वंदे मातरम'चे सामूहिक गायन केले.

## विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाच्या खेळाडू सन्मानित



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
भारताला विश्वचषक जिंकून देणाऱ्या महिला क्रिकेट संघाचा विजय क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव यांना प्रत्येकी २ कोटी २५ लाख, तर प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना २२ लाख ५० हजार आणि सर्व सहकारी यांना प्रत्येकी ११ लाख रुपये व सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

आयसीसी महिला विश्वचषक २०२५ मध्ये प्रथमच भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांचा वर्षा या शासकीय निवासस्थानी सत्कार केला. गोलंदाजी प्रशिक्षक आविष्कार साळवी, पद्मश्री डायना एडल्जी, ॲनालिस्ट अनिरुद्ध देशपांडे, लॉजिस्टिक सपोर्ट अपर्णा गंभीरराव, ऑपरेशन मॅनेजर मारुफ फजानदार, मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे, ममता शिरसुल्ला यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. आशिष शेलार, प्रधान सचिव संजय खंदारे, आयुक्त शितल तेली, उपसचिव सुनील पांढरे उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, विश्वचषकात भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. याचा संपूर्ण भारतीयांना अभिमान आहे. या विजयाने भारताचा गौरव वाढवला आहे.

सुरुवातीच्या काही पराभवानंतर संघाने केलेली पुनरागमनाची कामगिरी उल्लेखनीय आहे. प्रशिक्षक आणि संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करावे लागेल. या संघातील एकजूट आणि संघभावना महत्वाची असून यामुळे विजय मिळविणे शक्य झाले. स्मृती मानधना सध्या भारतातील आयकॉनिक खेळाडूंमध्ये गणली जाते. जेमिमाह रॉड्रिग्ज ने ही सेमीफायनलमध्ये अप्रतिम खेळी सादर केली. राधा यादवने संघर्षमय प्रवास करत आपले अस्तित्व निर्माण केले असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ऑलिम्पिक मध्ये भारतीय महिला संघ विजय मिळवेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

## जेकेमध्ये उधळला मोठा दहशतवादी कट

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ७ :**
राष्ट्रविरोधी कारवायांना मोठा धक्का देत, श्रीनगर पोलिसांनी गुरुवारी रात्री उशिरा दालगेट येथील कोनाखान येथील ममता चौकाजवळ तीन जणांना अटक केली आणि दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न उधळून लावला.

ही घटना नियमित वाहन तपासणी दरम्यान घडली जेव्हा पोलिसांनी नोंदणी क्रमांक नसलेल्या काळ्या रॉयल एनफील्ड मोटारसायकलला थांबण्याचा इशारा दिला. स्वार आणि इतर दोन जणांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु कर्तव्यावर असलेल्या सतर्क अधिकाऱ्यांनी त्यांना त्वरित थांबवले.

पोलिसांनी अटक केलेल्या तीन संशयितांची ओळख शाह मुतय्यब , कामरान हसन शाहआणि मोहम्मद नदीम अशी झाली आहे. झडती दरम्यान एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि नऊ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

## दगाबाज सरकारचा पंचनामा करा

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. ७ :**
निवडणुकीच्या तोंडावर सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देऊनही त्याचे पालन न करणाऱ्या दगाबाज सरकारचा शेतकऱ्यांनी पंचनामा करावा, असे आवाहन शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी जवळाबाजार व डोंगरकडा येथे केले.

हिंगोली जिल्ह्यातील डोंगरकडा व जवळाबाजार येथे ठाकरे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी विधान परिषदेचे विरोधीपक्ष नेते आंबादास दानवे, खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी खासदार चंद्रकांत खैरे, जिल्हा संपर्क प्रमुख बबनराव थोरात, सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे, जिल्हा प्रमुख अजय उर्फ गोपू पाटील सावंत, संदेश देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

उद्धव ठाकरे म्हणाले की, महायुतीचे सरकार दगाबाज सरकार आहे. जून महिन्यात कर्जमाफी देण्याचे सांगत आहे.शेतकऱ्यांनी शासकिय कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला पाहिजे असे ते म्हणाले.

## शाळा, रुग्णालयांतून भटके कुत्रे हटवा

■ **वृत्तसंस्था,नवी दिल्ली, दि. ७ :**
सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांशी संबंधित एका प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय देशभर लागू होईल असा निर्णय शुक्रवारी दिला.



सर्व राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांवरून भटक्या प्राण्यांना हटवावे. भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी रुग्णालये, शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात कुंपण घालावे. पकडलेल्या भटक्या कुत्र्यांना जिथून उचलण्यात आले होते त्याच ठिकाणी परत सोडले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे न्यायालय म्हणाले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एनव्ही अंजारिया यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले.

## नक्सल मोर्चावर मधमाश्यांचा हल्ला

■ **वृत्तसंस्था, बालाघाट, दि. ७ :**
मध्य प्रदेशमधील बालाघाटमध्ये नक्सल मोर्चावर शोधकार्य करत असलेल्या जवानांवर मधमाशांनी हल्ला केला. या घटनेत चार जवान गंभीर जखमी झाले असून त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

हे हॉकफोर्सच्या जवान गोदरी कॅम्पमधील आहेत. दोन दिवसांपूर्वी नक्सलवाद्यांशी झालेल्या तोंडओळखीनंतर ते जंगलात शोधकायासाठी उतरे होते. तीन-चार दिवसांपासून हे जवान जंगलात नक्सलवाद्यांच्या शोधात होते.

आज दुपारी पालागोंदी जंगलात शोधकार्य करणाऱ्या पथकावर अचानक मधमाशांनी हल्ला केला, ज्यामुळे सुमारे २० जवान या हल्ल्याच्या छायेत आले. यापैकी चार जवान सर्वाधिक जखमी झाले. या चार जखमींमध्ये तीन जवानांची परिस्थिती गंभीर होती. त्यांना तातडीने बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले.

# बांगलादेश सीमेवर तीन नवे तळ



■ **वृत्तसंस्था, सिलीगुडी, दि. ७ :**
ईशान्य भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने भारताने एक मोठे आणि धोरणात्मक पाऊल उचलले आहे. सिलीगुडी कॉरिडॉरवरील सुरक्षा बळकावण्यासाठी भारतीय लष्कराने तीन नवे लष्करी तळ उभारले आहेत.

हे तळ बामुनी, किशनगंज आणि चोप्रा येथे स्थापन करण्यात आले असून ते सर्व बांगलादेश सीमेजवळील अत्यंत संवेदनशील भागात आहेत. या निर्णयामागे अलीकडेच वाढलेली पाकिस्तान-बांगलादेश लष्करी जवळीक ही एक महत्त्वाची पार्श्वभूमी आहे.

२४ ऑक्टोबर रोजी पाकिस्तानच्या जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ कमिटीचे प्रमुख जनरल साहिर शमशाद मिर्झा आठ सदस्यीय प्रतिनिधीमंडळासह बांगलादेशात पोहोचले. त्यांच्या या भेटीदरम्यान बांगलादेशचे लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान यांच्यासह लष्करी सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. इतकेच नव्हे, तर मिर्झा यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांचीही भेट घेतली.

## याची नार्को अन् ब्रेन मॅपिंग टेस्ट करा..

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ७ :**
मनोज जरांगे यांना मी दोन प्रश्न केले म्हणून ते मला टार्गेट करत आहे. त्यांनी जे आरोप केले आहे त्यावर सीबीआय चौकशी व्हावी. माझ्यासह मनोज जरांगे यांची नार्को टेस्ट करावी, त्यासाठी कोर्टाकडून मी परवानगी काढतो. मुख्यमंत्री, छगन भुजबळ, मी, पंकजाताई यांच्यावर अश्लील भाषेत टीका केली पण आम्ही गप्प राहिलो, आम्हालाही वाटते मराठा समाजाला आरक्षण मिळावे पण ओबीसीला धक्का न लावता, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

जरांगेंच्या आरोपावर धनंजय मुंडेंची मागणी



धनंजय मुंडे म्हणाले की, माझा फोन २४ तास सुरू असतो, मी सामान्य माणसाला बोलत असतो. मनोज जरांगे तुम्ही जितके खोटे कराल ते तुमच्याही विरोधात फिरेल. मला टार्गेट करत आहात, तुम्ही मला लाथ मारत बाहेर काढले आहे. जरांगेच्या आंदोलनाच्या काळात ५०० लोकांनी आपला जीव दिला हे सर्व मनोज जरांगे यांनी लोकांना फसवले म्हणून झाले आहे.

मुंडे म्हणाले की, मला संपवून टाकतो हे ऑन एअर धमकी देत असेल तर त्यांचे काय करणार, मुख्यमंत्र्यांना संपवून टाकेल असे म्हटले मग त्यांना कायदा काही का करत नाहीत. या प्रकरणी सीबीआय चौकशी करावी, आणि नार्को टेस्ट करावी.

मुंडे म्हणाले की, तुम्ही हाकेंना मारले, वाघमारेंना मारले, किती उदाहरणे देऊ. केवळ ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये म्हणून आमचे वैर आहे. ओबीसीचे सर्व उपटून टाका ही धमकी कुणी दिली? असे अनेक प्रश्न करीत त्यांनी जरांगेवर टीकास्त्र सोडले.

## नार्को, सीबीआय चौकशीला तयार!

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. ७ :**
मनोज जरांगे पाटील आणि आमदार धनंजय मुंडे यांच्या वादाने पुन्हा वाढला आहे. जरांगे पाटील यांनी मुंडेंवर घातपाताचे आणि अन्य गंभीर आरोप केले होते. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेऊन ते आरोप खंडित केले आणि स्वतःची बाजू मांडली.

जरांगेंची तयारी




या वक्तव्यांनंतर जरांगे पाटीलही थेट माध्यमांसमोर येऊन पलटवार केला; त्यांनी धनंजय मुंडे यांना धन्या, म्हणून संबोधत ऑडिओ क्लिप ऐकवली आणि त्यातले पुरावे दाखवले. जरांगे पाटील म्हणाले की, त्यांच्या आणि मुंडेंमध्ये वैयक्तिक वैर नाही, पण जे घडले ते चेष्टेचा विषय नाही.

त्यांनी सांगितले की त्यांच्याकडे पोलिसांच्या अधीक्षकांना दिल्याच्या तक्रारीत आठ-दहा जणांची नावे आहेत आणि त्यात मुंडे यांचे नावही आहे. जरांगे यांनी स्पष्ट केले की, ते राजकीय हेतूने चेष्टा करीत नाहीत, तर सार्वजनिक सुरक्षा आणि आरक्षणाच्या प्रश्नांसंदभार्तील गंभीर बाब आहे. त्यांनी पुढे म्हटले की, जर कोणाच्याही शंका असेल तर तो नार्को टेस्ट करा, आणि ते स्वतःही त्यासाठी तयार आहेत.

ऑडिओ क्लिप संदर्भात जरांगे पाटील म्हणाले की त्यांच्याकडे काही रेकॉर्डिंग्स आहेत ज्यात धनंजय मुंडेंशी संबंधित काही आरोपींची माहिती आहे. त्यांनी ते क्लिप मीडियाला ऐकवली आणि सांगितले की क्लिपमधील दोन व्यक्ती आरोपी आहेत.

जरांगे यांनी धनंजय मुंडे यांना थेट विचारले की ते कोणत्या आरोपींना पाठवत होते? त्यांनी सीडीआर, ड्रोन मॅपिंग आणि इतर तांत्रिक तपासणीची मागणी केली आहे, आणि त्या तपासण्या करूनच सत्य समोर यावे, असे त्यांनी म्हटले. याशिवाय त्यांनी मुंडेंवर अनेक आरोप केलेत.



समाजशास्त्रज्ञ
स्व.प्रा.डॉ. मुरलीधरराव रामराव देशमुख (काजळीकर)
यांच्या जयंती निमित्त
विनम्र आदरांजली..
प्रा.धनंजय गुडधे, श्री.सुरेशराव देशमुख (पुसदेकर), प्रा. हेमंत देशमुख, श्री. महेंद्रराव बेनाडीकर (कोल्हापूर), श्री. अजयराव धुमाळ (मुंबई), श्री.रणजीतराव बंड, डॉ. अजय गुडधे, प्रा. शिरीष देशमुख, प्रा.प्रविण देशमुख, श्री.छोटूभाऊ देशमुख, श्री. सुनील देशमुख, श्री.प्रकाश देशमुख (साऊरकर), डॉ.रिपल राणे (आर्वी), श्री. सुनिल शिसोदे (नायगाव), प्रा.प्रतिक देशमुख, श्री. यश्मीत बंड, श्री. मोहित बेनाडीकर (कोल्हापुर), श्री. यश धुमाळ (मुंबई), प्रा. प्रताप देशमुख, अनिल देशमुख, मंगेश शिसोदे, श्री. रितेश घोगरे, श्री. योगेश घोगरे (वर्धा), मयूर देशमुख, इंजी.कार्तीक देशमुख व काजळीकर परिवार

# नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवा : मुख्यमंत्री फडणवीस



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा गुन्हे सिद्धतेमध्ये चांगला उपयोग होत आहे. या कायद्यांच्या प्रत्येक घटकातील अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत दिले. ज्या घटकातील अंमलबजावणीमध्ये राज्य मागे आहे, अशा घटकाच्या अंमलबजावणीमध्ये पुढील काळात महाराष्ट्र देशात अन्य राज्यांच्या तुलनेत अव्वल असण्याची अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

बैठकीस गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुन्हा घडल्यानंतर जलद गतीने तपास पूर्ण करीत आरोपींना शिक्षा देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग या कायद्यांच्या अंमलबजावणीमधून करण्यात येत आहे. यामुळे निश्चितच जलद गतीने आरोपींना शिक्षा होत आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्यात यावी. कायद्याच्या प्रत्येक घटकाची अंमलबजावणी करताना अन्य राज्यांशी तुलना करण्यात यावी. यावरून आपली स्थिती समजून ज्या घटकाच्या अंमलबजावणीत वेग घेणे आवश्यक आहे तो घेण्यात यावा. सीसीटीएनएस (क्राइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स) प्रणालीवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदविण्यात आलेले एफआयआर इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच न्यायालयाकडे जावेत. ही प्रणाली गतीने कार्यान्वित करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. आरोप सिद्ध झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करण्याचे प्रमाण वाढविण्यात यावे. यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. कारागृह प्रशासनाच्या अनुषंगाने नागपूर आणि अमरावती दोन स्वतंत्र विभाग निर्माण करावे. नागपूर आणि वर्धा येथे नवीन कारागृह निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. यावेळी ठाणे कारागृह निर्मितीचा आढावाही घेण्यात आला. ई- साक्ष ला एफआयआर संलग्न करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. कायद्यांच्या अंमलबजावणी संदर्भात सर्व पोलीस यंत्रणाचे प्रशिक्षण पूर्ण करून वेळोवेळी क्षमता बांधणीचे उपक्रम राबविण्यात यावे. गुन्हा सिद्धतेमध्ये न्याय सहाय्यक प्रयोगशाळांच्या नवीन मोबाईल व्हॅनचा उपयोग करावा. बैठकीला अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन) राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) इक्बाल सिंग चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, न्यायिक व तांत्रिक विभाग महासंचालक संजय वर्मा, प्रधान सचिव (विशेष) अनुप कुमार सिंग, प्रधान सचिव (विधि व न्याय) सुवर्णा केवले, सचिव (वैद्यकीय शिक्षण) अपर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता आदी उपस्थित होते.

### राज्यातील नवीन फौजदारी कायद्याची सद्यस्थिती थोडक्यात

राज्यात २ लाख ८८४ पोलिस अधिकारी / कर्मचारी यांचे प्रशिक्षण पूर्ण, दूरदृष्टी संवाद प्रणाली व्यवस्था २१४८ कोर्ट रूम आणि ६० कारागृहांमध्ये उपलब्ध, घरबसल्या तक्रार नोंदवण्यासाठी ई - एफआयआर ची सुविधा, १ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ९५८ ई- एफआयआर दाखल. कोणत्याही पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी झिरो एफआयआर सुविधा, १ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत १२ हजार ३९८ झिरो एफआयआर, यामध्ये अन्य राज्यांकडून आलेले एफआयआर २८७१. नवीन फौजदारी कायद्यातर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ६० दिवसांच्या आत १ लाख ३४ हजार १३१ गुन्ह्यांमध्ये आरोप पत्र दाखल करण्यात आले.

## अजित पवारांनी राजीनामा दिला पाहिजे अंबादास दानवेंची मागणी



**छत्रपती संभाजीनगर :** अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठं वादळ निर्माण केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून 1,800 कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ 300 कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे 152 कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी एक रुपयाचाही व्यवहार झाला नसल्याचे अजित पवारांनी पत्रकार परिषद घेत सांगितले. तसेच या प्रकरणातील रजिस्ट्रेशन सुद्धा रद्द करण्यात आल्याची माहिती पवारांनी दिली. आता यावर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी आक्षेप घेतला आहे. अंबादास दानवे म्हणाले, माझा साधा प्रश्न आहे, एखाद्याने चोरी केली, चोरीचा सगळा ऐवज पोलिसांनी जप्त केला. जप्त केल्यानंतर चोरीचा गुन्हा रद्द होतो का? हा माझा साधा प्रश्न आहे. त्यामुळे हा व्यवहार रद्द केला म्हणून हा प्रश्न सुटणार नाही. या प्रश्नात पार्थ पवारांचे नाव का नाही? त्याचे कारण दिले जाते की त्यांची सही नव्हती. कंपनी आहे ती, कंपनीवर गुन्हा दाखल करा. 99 टक्के शेअर पार्थ पवारांचे आहे, एक टक्का पाटीलचा आहे. ज्याचा एक टक्का शेअर आहे, त्याच्यावर गुन्हा दाखल होतो आणि 99 टक्के शेअर असणाऱ्यावर गुन्हा दाखल होत नाही? असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, या कंपनीवर गुन्हा दाखल करा. मग या कंपनीकडे 300 कोटी कुठून आले याची चौकशी करा, जी सरकारी जमीन आहे, ही सरकारी जमीन कशी काय विकली गेली?

## काँग्रेसमध्ये इच्छुकांच्या महापुरामुळे जागावाटप तिढा वाढण्याची शक्यता

**मुंबईच्या सहा जिल्ह्यांतून ११५०हून अधिक अर्ज दाखल**

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या घोषणेपूर्वीच काँग्रेसमध्ये उमेदवारीसाठी मोठी चढाओढ सुरू झाली आहे. पक्षाच्या आदेशानंतर काही दिवसांतच तिकिटासाठी ११५० हून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. हा विक्रमी आकडा मानला जात आहे. मुंबईतील सहाही जिल्ह्यांमधून इच्छुकांनी दाखवलेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मुंबई काँग्रेसमध्ये उत्साहाचे वारे वाहत आहेत. मुंबई काँग्रेसचे प्रवक्ते आणि माध्यम समन्वयक सुरेशचंद्र राजहंस यांनी या घडामोडींवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, महापालिकेची आरक्षण सोडत लवकरच अपेक्षित आहे. त्यामुळे अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांना आणखी संधी मिळावी, या उद्देशाने मुदतवाढ देण्यावर विचार सुरू आहे. इच्छुकांच्या या महापुरामुळे पक्षात तिकीट मिळवण्यासाठी मोठी स्पर्धा असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष, खासदार वर्षाताई गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीच्या तयारीला सुपरफास्ट गती मिळाली आहे. पक्षाने शहरातील २२७ वॉर्डांसाठी स्वतंत्र इन्चार्ज नियुक्त केले असून त्यांच्या माध्यमातून वॉर्डस्तरावर बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. आता लवकरच मोर्चे बांधणीलाही सुरुवात होणार आहे.

## १ कोटींची डील झाली होती : करुणा मुंडे
### धनंजय मुंडेंनीच मनोज जरांगे पाटलांच्या हत्येचा कट रचला



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

माजी मंत्री धनंजय मुंडे आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यातील वाद आता अधिकच पेटला आहे, कारण मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आपल्या हत्येचा कट रचल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. या आरोपांना धनंजय मुंडे यांनी तीव्र विरोध करत फेटाळून लावले असून, त्यांनी या प्रकरणाची सखोल सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या वादात आता स्वराज्य शक्ती सेनेच्या अध्यक्षा करुणा मुंडे यांनी उडी घेतली असून, त्यांनी उलट धनंजय मुंडे यांनीच मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याचा अत्यंत गंभीर दावा केला आहे, ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

करुणा मुंडे म्हणाल्या, मनोज जरांगे पाटील यांच्यावरील हल्ल्याचा कट धनंजय मुंडे यांनीच केला असणार. धनंजय मुंडे यांनी स्वतःच्या बायकोला सोडले नाही. गेल्या अनेक वर्षांपासून ते मला त्रास देत आहेत. मनोज जरांगे पाटील यांची आतील टीम फोडण्याचे काम धनंजय मुंडे यांनी केली आहे. पोलिसांच्या कैदेत असलेला आरोपी दादा गरड माझ्याकडे तीन वेळा येऊन गेला आहे. जेव्हा मी जरांगेकडे गेली होती. त्याने मला मेसेज केला तेव्हा मी जरांगेकडे होते. त्यानंतर लगेच धनंजय मुंडेंना माहिती मिळाली की मी मनोज जरांगेंकडे गेली आहे.

पुढे बोलताना करुणा मुंडे म्हणाल्या, दादा गरड यांचे मोबाईल तपासा. व्हॉट्सअ‍ॅप चॅट्स आहेत. मेसेज आहेत. धनंजय मुंडे यांनी त्याला सॉरी म्हणून मेसेज केला होता. ते खूप गरीब व्यक्ती आहेत. धनंजय मुंडेंनी त्याला पाच लाख रुपये पाठवले होते. एका गरीब माणसाला धनंजय मुंडे सॉरी का बोलतोय. पाच लाख कशासाठी दिले. हे सर्व पुरावे त्यांच्या मोबाईलमध्ये आहेत. मला दुसऱ्या आरोपीचीही रेकॉर्डिंग त्याने ऐकवली होती. त्यांची 1 कोटीची डील सुरु होती, असा गंभीर दावा करुणा मुंडे यांनी केला आहे.

तसेच हेत सत्य बाहेर आणण्यासाठी धनंजय मुंडे, मनोज जरांगे पाटील आणि माझी देखील नार्को टेस्ट करावी, अशी मागणी करुणा मुंडे यांनी केली आहे. धनंजय मुंडे सारखी नासकी वृत्ती आम्हाला संपवायची आहे. धनंजय मुंडेंना मराठवाड्यातून नव्हे, तर देशातून बाहेर काढून अमेरिकेला पाठवावे आणि त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी मागणी करुणा मुंडेंनी केली आहे.

## मुंबईत लोकलने ५ प्रवाशांना उडवले दोघांचा मृत्यू तर एकजण गंभीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे रेल्वे कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे मध्य रेल्वे मार्गावरील लोकल वाहतूक विस्कळीत झाली असताना, मुंबईत एक अत्यंत दुर्दैवी अपघात घडला आहे. सँडहर्स्ट रोड स्टेशनजवळ रुळांवरून पायी चालणाऱ्या चार प्रवाशांना अंबरनाथ फास्ट लोकलने धडक दिली.

या भीषण अपघातात दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे, एक प्रवासी जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. तर, दोन प्रवासी किरकोळ जखमी झाले असून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.

रेल्वे कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे लोकल सेवा बंद होती आणि त्यामुळे सर्वच स्थानकांवर प्रचंड गर्दी वाढली होती. लोकलसेवा बंद असल्याने हे चार प्रवासी सँडहर्स्ट रोड स्टेशनजवळ रुळांवरून चालत होते, त्याच वेळी अचानक आलेल्या लोकलने त्यांना उडवले.

घटनेबाबत बोलताना मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी म्हणाले, सँडहर्स्ट रोड स्टेशनवर काही प्रवासी चालले होते. त्यांना अंबरनाथ फास्ट ट्रेनने धडक दिली. आत्तापर्यंत जी माहिती समोर आली आहे त्यानुसार तिघांना धडक लागली आहे.

सीएसएमटीवरून लोकल वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे कामावरून घरी जाणाऱ्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल होत आहेत. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा फटका ठाणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांनाही बसला आहे. मध्य रेल्वे मार्गावरील लोकल सध्या 40 ते 45 मिनिटे उशिराने धावत असून, अप आणि डाऊन दोन्ही मार्गांवर वाहतूक विस्कळीत झाली आहे.

## मुख्यमंत्री कुठलाच भ्रष्टाचार सहन करत नाहीत : चंद्रकांत पाटील



**पिंपरी- चिंचवड :** राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पार्थ पवार जमीन गैरव्यवहार प्रकरणी महत्वाचं विधान केले आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलत होते. कुठल्याही निष्कर्षावर पोहचणे बरोबर नाही. पार्थ पवार एकटे कसे अजित पवारांचा यात सहभागी असेल. हे सर्व काही तपासांती समोर येईल. अस चंद्रकांत पाटील यांनी अधोरेखित केले आहे. पुण्यातील बहुचर्चित जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांच नाव घेतलं जातं आहे. परंतु, अद्याप त्यांच्यावर गुन्हा दाखल नाही. कोंढवा येथील ४० एकर जमीन कवडीमोल भावात पार्थ पवार यांची भागीदारी असलेल्या अमेडिया कंपनीने घेतली आहे. यावरून आता राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मत व्यक केलं आहे. ते म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुठलाच भ्रष्टाचार सहन करत नाहीत. या प्रकरणात तात्काळ तहसीलदार यांना निलंबित केलं आहे. आय.जी दर्जाचे अधिकाऱ्याची याप्रकरणी चौकशीसाठी नेमले आहे.

## नाशिकमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात तरुण ठार

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ७ :

नाशिक तालुक्यातील लोहशिंगवे गावात एका बिबट्याच्या हल्ल्यामुळे ३५ वर्षीय सुदाम जुंदरे याचा दुर्दैवी मृत्यू झाला. पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास ग्रामस्थांना गावाजवळ छिन्नविछिन्न अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे आणि नागरिक चांगलेच आक्रमक झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून लोहशिंगवे परिसरात बिबट्याचा सतत वाढता संचार दिसत असून, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याआधीही नाशिक जिल्ह्यातील सिन्नर आणि देवळाली परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांमुळे तिघांचा बळी गेला होता. सतत वाढत असलेल्या या घटनांमुळे वन विभागावर नागरिकांचा रोष व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांनी तत्काळ हल्लेखोर बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांचा आग्रह आहे की पिंजरा लावून बिबट्याला ताब्यात घेण्यात यावे.

## आमदार भास्कर जाधव यांचा मुलगा विक्रांत जाधव अडचणीत

**लोटे एमआयडीसीत मारहाण प्रकरण**

■ महासागर प्रतिनिधी, रत्नागिरी, दि. ७ :

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार भास्कर जाधव यांचा मुलगा विक्रांत जाधव पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. लोटे एमआयडीसी परिसरात शिंदे गटाच्या युवासेना पदाधिकाऱ्याला मारहाण केल्याचा प्रकार समोर आला असून या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लोटे एमआयडीसीतील एका कंपनीच्या बांधकामाच्या ठेक्यावरून दोन्ही गटांमध्ये वाद झाला. हा वाद चिघळत जाऊन त्याचे रूप शिवीगाळ आणि मारहाणीमध्ये झाले. याप्रकरणी विक्रांत जाधव यांच्यासह अन्य दहा जणांवर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, दोन्ही शिवसेना गटांमधील कार्यकर्त्यांमध्ये हा संघर्ष झाल्याने स्थानिक राजकारणात चांगलीच खळबळ उडाली आहे. स्थानिकांना रोजगार देण्याच्या विषयावरून या दोन गटांमध्ये जुंपल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेला माहिती नुसार, लोटे कामावरून दोन्ही शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये जुंपल्याचे यावेळी बघायला मिळाले. तर स्थानिकांना काम देण्यावरून यात दोन गटात जुंपली. दरम्यान हा सर्व प्रकार घडत असताना उद्धव गटाचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विक्रांत जाधव यांचा शिवीगाळ करत मारहाण करतानाचा व्हिडिओ कॅमेरात कैद झाला असून तो आता समाज माध्यमांमध्ये व्हायरल होतो आहे.

तर तुमचा मंत्री आहे म्हणून तुम्ही वाट्टेल ते करणार का? असं म्हणत योगेश कदम यांचा कार्यकर्ता असलेल्या सचिन कातेला विक्रांत जाधव यांनी प्रश्न केला.

लोटे एमआयडीसीतील मारहाण प्रकरणात विक्रांत जाधव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून जाधव यांच्यासह आणखी दोन जण शिवाय सात ते आठ अनोळखी लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्यामध्ये भारतीय न्याय संहिता 189(1), 189( 2 ), 190, 191 (2) 115 (2) 352, 351 (3) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बावधन पोलिसांचा दुय्यम निबंधक कार्यालयात छापा

**मुंबई :** पुण्यातील मुंढवा परिसरातील सरकारी जमिनीच्या खरेदी व्यवहारावरून राज्यात मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने 1800 कोटी रुपयांच्या बाजारभावाची जमीन केवळ 300 कोटी रुपयांत खरेदी केली, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या व्यवहारात शासनाची 152 कोटी रुपयांची फसवणूक झाली असल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. या व्यवहारात सामील असलेल्या सह निबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करण्यात आले आहे.

बावधन पोलिसांनी दुय्यम निबंधक कार्यालयात छापा टाकत सर्व कागदपत्रे जप्त केली असून, तपासात अनेक नवीन बाबी समोर येण्याची शक्यता आहे. मुंढव्याच्या या वादग्रस्त जमिनीचा इतिहासही तितकाच गुंतागुंतीचा आहे. ब्रिटिश राजवटीपूर्वी ही जमीन महार समाजातील लोकांना वतन म्हणून दिली होती. 1973 साली ही जमीन बोटॅनिकल सर्वे ऑफ इंडिया या केंद्र सरकारच्या संस्थेला 15 वर्षांच्या करारावर देण्यात आली.

## पुणे जमीन घोटाळा प्रकरणी विविध संघटनांचे रास्ता रोको आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ७ :

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी पुणे शहरातील कोरेगाव पार्क येथील 1800 कोटींची जमीन 300 कोटींना पार्थ पवार यांनी खरेदी केल्याची माहिती समोर आली.या जमीन खरेदी व्यवहार प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधी पक्षातील नेत्यांनी केली. तर या प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पण या जमीन खरेदी व्यवहार प्रकरणातील



नोंदीमध्ये अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांचे नाव असून देखील पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल झाला नाही.त्यामुळे राजकीय वतुर्ळात चचार्ना उधाण आले आहे. त्या सर्व घडामोडी दरम्यान मुंढवा येथील ज्या शासकीय जमिनीचा खरेदी विक्रीचा व्यवहार झाला. त्या ठिकाणी विविध संघटनांनी रास्ता रोको करीत आमच्या जमिनी अजित पवार यांनी आम्हाला परत द्याव्यात, पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी यावेळी केली.

## फेसबुकवरून राज्य चालत नाही
### उद्धव ठाकरेंवर शिंदेंचा जोरदार प्रहार




■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :

राज्याच्या राजकीय रणांगणात पुन्हा एकदा शब्दांचे शस्त्र उगारत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता तीव्र हल्ला चढवला. मुख्यमंत्री असताना घरात बसलात, फेसबुकवरून राज्य चालत नाही! अशा शब्दांत शिंदेंनी ठाकरेंवर थेट वार केला.

चाकणमधील सभेत अतुल देशमुख आणि शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने शिंदेंचा आत्मविश्वास ओसंडून वाहताना दिसला. भगव्याचं ठाणे आहेच, पण आता भगव्याचं पुणे करायचं आहे. विरोधकांचं डिपॉझिट जप्त झाल्याशिवाय आम्ही थांबणार नाही! अशी घोषणा देत त्यांनी ३ डिसेंबरला गुलाल उधळण्याची तयारी ठेवा असं जाहीर केलं. ठाकरेंवर टीका करताना शिंदे म्हणाले, अडीच वर्ष मुख्यमंत्री राहून तुम्ही घरात बसलात. आम्ही मात्र कोल्हापूरचा पूर असो वा इर्शाळवाडीचं दुःख - थेट घटनास्थळी पोहोचलो. आम्ही बोलत नाही, थेट देतो!

शिंदेंनी आपल्या सरकारच्या योजनांची यादीही मांडली ३२ हजार कोटींचं पॅकेज, कर्जमाफी, लाडकी बहिण योजना, महिलांना अर्धं तिकीट, दुहेरी अनुदान! आम्ही देना बँक, ते लेना बँक! अशी उपरोधिक टिप्पणी करत शिंदेंनी विरोधकांच्या सोशल मीडियावरील राजकारणावर टोला लगावला. पुण्यातील सभेत शिंदेंनी शिवसेनेतील ऐक्य, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर ठाम राहण्याचा संकल्प पुन्हा उच्चारला.

हा पक्ष कोणाचं मालकी हक्क नाही, हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे! असं ठणकावत त्यांनी पुण्याच्या विकासासाठी रस्ते, पाणीपुरवठा, आळंदी संत स्मारक आणि मेट्रो प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांची कामं जाहीर केली. शेवटी, कार्यकर्त्यांना उद्देशून शिंदे म्हणाले आता विरोधकांचं राज्य संपलंय; ३ डिसेंबरला भगव्याचाच गुलाल उधळला जाईल!

## मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस अमरावती जिल्हा आढावा बैठक

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :



आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे जिल्हा निहाय आढावा बैठका सुरु आहे. आज दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी अमरावती जिल्हा आढावा बैठकीत स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणूका व जिल्हा परिषद निवडणुकी संदर्भात आढावा घेण्यात आला.

या बैठकीमध्ये अमरावती विधानसभा मतदार संघाच्या सुलभा संजय खोडके यांनी अमरावती जिल्ह्यातील महानगर पालिका, जिल्हा परिषद, १० नगर पालिका, २ नगरपंचायती मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची परिस्थिती, गत काळातील पार्श्वभूमी, मतदारसंघनिहाय परिस्थिती, संघटनात्मक बळकटी आणि संभाव्य इच्छूक उमेदवार आदींबाबत विस्तृतपणे माहिती दिली. यावेळी बैठकीला उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, रुपालीताई चाकणकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आ.संजय खोडके, जेष्ठ नेतेगण तसेच अमरावती जिल्हातील जेष्ठ महिला पदाधिकारी सुरेखाताई ठाकरे, यश खोडके, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष ( शहर) प्रशांत डवरे, ग्रामीण अध्यक्ष संतोष महात्मे, माजी सभापती अविनाश मार्डीकर, माजी महापौर अ‍ॅड. किशोर शेळके, माजी उपमहापौर शेख जफर आदींसह स्थानिक प्रमुख पदाधिकारी.

## कृषि समृद्धी योजनेत चिया लागवडीसाठी अर्ज करा
# प्रत्येक तालुक्यात ५३५ शेतकऱ्यांना लाभ मिळेल : 'एसएओं'चे आवाहन

**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :** जिल्ह्यात चिया लागवड क्षेत्रात वाढ करण्याच्या दृष्टीने कृषी समृद्धी योजनेत चिया लागवडीसाठी प्रत्येक तालुक्यातील ५३५ शेतक–यांना लाभ देण्यात येणार आहे. अकोला जिल्ह्यात एकूण ३ हजार ७४५ शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे.

या योजनेत चिया पीक प्रात्याक्षिकासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के मर्यादेत प्रोत्साहनपर अनुदान (६ हजार रू. प्रतिएकर) इतके असेल. एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त २ हेक्टरपर्यंत लाभ घेता येईल. सहाय्यक कृषि अधिका–यांमार्फत शेतकऱ्यांनी लागवड केल्याचे प्रमाणपत्र व लागवडीचा जिओ टॅग फोटो अनुदान मिळण्यासाठी बंधनकारक राहील.लाभासाठी विहित अर्ज केलेला असावा. शेतकरी ओळखपत्र, सातबारा/ ८ अ अनिवार्य,तालुका कृषी अधिकारी यांचे पूर्वसंमती पत्र आवश्यक आहचिया पिकाचे क्षेत्र वाढवणे आणि उत्पादन क्षमता सुधारणा करणे, तंत्रज्ञान–संवर्धीत शेती पद्धती वापरून उत्पादनाची गुणवत्ता टिकवणे, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपनीद्वारे सामुहिक कार्य व बाजार व्यवस्थेत सुधारणा करणे अशी योजनेची उद्दिष्टे आहेत.जिल्ह्यातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी चिया लागवडीसाठी १५ डिसेंबरपर्यंत तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज करावे.

# तरुणाईच्या प्रचंड प्रतिसादाने कृषि विद्यापीठात गुंजला 'वंदे मातरमचा' सूर!

■सर्वार्थाने आत्मनिर्भर-सर्व संपन्न देश घडविणेसाठी एकात्मिक प्रयत्नांची मोट बांधू- कुलगुरू डॉ. शरद गडाख

■'वंदे मातरम' रचनेची सार्ध शताब्दी तथा विद्यार्थी दिवस कार्यक्रमाचे अकोला कृषि विद्यापीठात भव्य आयोजन!





**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

हजारो शहिदांच्या बलिदानातून साकारलेले स्वातंत्र्य केवळ अबाधित ठेवणेच नव्हे तर संपूर्ण विश्वाला हेवा वाटेल असे सर्वार्थाने परिपूर्ण आत्म निर्भर राष्ट्र निर्मितीसाठी राष्ट्र हाच धर्म मानून एकात्मिक प्रयत्नाची मोट बांधणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करताना डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी युवकांच्या देशातील तरुणाईकडे संपूर्ण जगाचे लक्ष असल्याचे प्रतिपादन करीत राष्ट्रप्रेम अधिकच वृद्धिंगत केले.

थोर स्वातंत्र्य सेनानी व थोर कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी आपल्या ज्या अजरामर गीतातून क्रांतीची जाज्वल्य ज्योत सबंध देशभर पेटवली, त्यांच 'वंदे मातरम' या गीत रचनेला १५० वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी–कर्मचारी तथा विद्यार्थी वर्गासाठी आयोजित सामूहिक ' वंदे मातरम ' गायनाच्या तथा विद्यार्थी दिवस कार्यक्रमाचे प्रसंगी अध्यक्षीय संबोधन करताना ते बोलत होते. जागतिक पटलावर सर्वाधिक लोकसंख्याक आपल्या देशातील जनतेला आवश्यक दोन वेळचे सकस, निर्भेळ,विषमुक्त अन्नधान्य निर्मितीसाठी आपण सर्वांनीच कटिबद्धता व्यक्त करावी तथा निष्पक्ष, निष्कपट आचरणाने भ्रष्टाचार तथा भयमुक्त समाज साकारण्यात आपले योगदान द्यावे असे आवाहनही डॉ. गडाख यांनी याप्रसंगी केले. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूल मधील शालेय प्रवेश दिन ' विद्यार्थी दिवस ' म्हणून संपूर्ण राष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणाच प्रेरणास्त्रोत ठरत असल्याचे देखील प्रतिपादित केले.

कृषी महाविद्यालय अकोला च्या स्व. के आर ठाकरे सभागृहात संपन्न झालेल्या या अतिशय भावनाप्रधान कार्यक्रमाचे प्रसंगी विद्यापीठाचे अधिष्ठाता (शिक्षण) डॉ. देवानंद पंचभाई, अधिष्ठाता (कृषी अभियांत्रिकी) डॉ. सुरेंद्र काळबांडे, कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे, कृषी महाविद्यालय अकोला चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी, विद्यापीठ अभियंता सुनील थोटांगे, नियंत्रक राजीव कटारे आदींची विचार मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात कृषी महाविद्यालय अकोलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर यांनी सामूहिक वंदे मातरम गीत गायन कार्यक्रमाची रूपरेषा सादर करताना वंदे मातरम गीताचे महात्म्य उपस्थितांना अवगत केले तर अधिष्ठाता कृषी डॉ. देवानंद पंचभाई यांनी वंदे मातरम गीताद्वारे स्वातंत्र्यपूर्व काळातील पेटून उठलेली तरुणाई अधोरेखित केली. याप्रसंगी सभागृहात उपस्थित असलेल्या ५००हून अधिक विद्यार्थी–विद्यार्थ्यांनी, अधिकारी–कर्मचारी वर्गाने एक ताल–एक सुरात 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन केले. याच उपक्रमाचे औचित्य साधत कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे मार्गदर्शनात विद्यापीठाचे संपूर्ण कार्यक्षेत्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये निबंध, रील बनविणे, लोगो डिझाईन तथा कविता लेखन आदींचा समावेश होता. अधिष्ठाता कृषी डॉ. देवानंद पंचभाई यांचे नेतृत्वात विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे तथा या उपक्रमाचे नोडल अधिकारी समर्थ कृषी महाविद्यालय देऊळगाव राजाचे प्राचार्य डॉ.नितीन मेहत्रे यांनी अथक परिश्रम घेत सदर स्पर्धा यशस्वी केल्या व यातील पात्र स्पर्धकांना मान्यवरांचे शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे यांनी केले. या अतिशय भव्यदिव्य आयोजनासाठी अधिष्ठाता कृषी, विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा सहयोगी अधिष्ठाता कृषी महाविद्यालय, अकोला कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी वर्गानी अथक परिश्रम घेतले.

# 'वंदे मातरम'ची सार्ध शताब्दी पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत 'वंदे मातरम'चे सामूहिक गायन

**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**



वंदे मातरम गीतरचनेच्या सार्ध शताब्दीनिमित्त हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सामूहिक वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत आज झाला.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात 'वंदे मातरम' रचनेच्या सार्ध शताब्दीनिमीत्त राष्ट्रीय गीताचे सामूहिक गायन झाले. यावेळी पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे आदी उपस्थित होते.यावेळी विद्यार्थी, युवकांबरोबरच ज्येष्ठ नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

प्रारंभी पालकमंत्र्यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. देशाचे पहिले कृषीमंत्री भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याला पालकमंत्र्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हजारो विद्यार्थ्यांच्या मुखातून वंदे मातरमचे सूर निनादले.यावेळी स्वदेशीची शपथही घेण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# जिल्हा परिषदेच्या प्रांगणात गीताचे सामूहिक गान



**अकोला :** वंदे मातरम या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आज जिल्हा परिषदेच्या प्रांगणात या गीताचे सामूहिक गान करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, शिक्षणाधिकारी प्राथमिक रतनसिंग पवार, मुख्य लेखा वित्त अधिकारी माया शिर्के, कृषी विकास अधिकारी तुषार जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी बळीराम गाढवे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद जाधव, पंचायत विभागाचे सहाय्यक गटविकास अधिकारी हरिनारायण परिहार, उप विभागीय उपअभियंता कांचन उमाळे यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शास्त्री क्रीडांगणावर निनादला भारतभूमीच्या गौरवाचा सूर हजारो विद्यार्थी एकाचवेळी गायले 'वंदे मातरम'



**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

स्वातंत्र्य सेनानी व थोर कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी क्रांतीची जाज्वल्य ज्योत आपल्या गीतातून सबंध देशभर पेटवली. 'वंदे मातरम' या गीत रचनेला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित अकोला येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलांची व मुलींची यांच्या लाल बहादूर शास्त्री क्रीडांगणावर हजारो विद्यार्थी, तरुणांच्या उपस्थितीत 'वंदे मातरम' गायनाचा सामूहिक सोहळा संपन्न झाला. वंदे मातरमब पथनाट्य सादर करण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम,मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने, कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग सहायक उपायुक्त दत्तात्रय ठाकरे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संतोष साळुंके, उपविभागीय अधिकारी डॉ शरद जावळे, तहसीलदार सुरेश कव्हळे,शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) प्राचार्य शरदचंद्र ठोकरे आदी उपस्थित होते.

# अजित पवार गटाच्या आमदाराविरोधात अकोला मुख्य न्यायिक दंडाधिकारी न्यायालयात फौजदारी खटला दाखल

**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

अहिल्या नगर (अहमदनगर) येथील विधानसभेचे सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते संग्राम अरुण जगताप यांनी दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी सोलापूरमध्ये आयोजित हिंदू आक्रोश मोर्चाच्या सभेत दीपावलीच्या पार्श्वभूमिवर एका विशिष्ट धर्मीय समाजाच्या भावनांना ठेस पोहोचविणारे, तसेच दोन वेगवेगळ्या जाति–धर्मांमध्ये फूट पाडून सामाजिक व सांप्रदायिक तणाव निर्माण करण्याच्या उद्देशाने बेजबाबदार व उत्तेजक विधान केल्याचा गंभीर आरोप आहे.या वक्तव्यामुळे देशभरातील एका मोठ्या घटकाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून, या प्रकरणाचा परिणाम अकोला शहर व जिल्ह्यातही दिसून आल्याचे नमूद करण्यात आले आहे.या संदर्भात अकोल्यातील प्रसिद्ध समाजसेवक, कच्छी मेमन बिरादरीचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस

## धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप

(शरद पवार गट) चे नेते जावेद जकरिया यांनी रामदासपेठ पोलीस ठाण्यात तसेच जिल्हा पोलीस प्रशासन आणि विधानसभा अध्यक्षांकडे लिखित तक्रार दाखल केली होती. मात्र, संबंधित आमदार सत्ताधारी गटातील प्रभावशाली नेता असल्याने तक्रारीवर कोणतीही कारवाई न झाल्याचा आरोप करण्यात आला.त्यामुळे जावेद जकरिया यांनी अकोल्याचे वरिष्ठ फौजदारी वकील अधि. नजीब शेख यांच्या माध्यमातून अकोला मुख्य न्यायिक दंडाधिकारी न्यायालयात थेट फौजदारी खटला दाखल केला आहे.जकरिया यांच्या याचिकेची दखल घेत न्यायालयाच्या रजिस्ट्रार यांनी फौजदारी चउअ खटला नोंदवून योग्य न्यायालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे.

(नळ जोडणी अपडेट करावी,अन्यथा पाईपलाईन डिस्कनेक्ट) या आशयाची खोटी बातमी होत आहे सोशल मिडीयार व्हायरल

# शहरातील नळ धारकांनी सावध राहावे व वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर ऑनलाईन कराचा भरणा करू नये

## –अकोला महानगरपालिका,प्रशासन

**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील काही नागरिकांना सोशल मिडीयाद्वारे (NOTICE FROM AKOLA MAHANAG$AR PALIKA (AMC) Dear Consumer, We inform you a notice has been issued to Disconnected your PIPELINE WATER CONNECTION, Because your Previous month bill was not udated lease Call MR DEVESH$ JOSHI or udate your bill immediately. Call ७५८३८९१७२९. Thank you, Team AMC PIPELINE) या आशयाची चुकीची पोस्ट टाकण्यात येत असून अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नळ जोडणी धारकांनी अशा मॅसेज पासून सावध राहावे तसेच मनपा प्रशासन किंवा पाणी पुरवठा विभागाव्दारे असा कोणत्याही प्रकारचा मॅसेज टाकण्यात आलेला नसून नागरिकांनी अशा कोणत्याही व्याक्तिशी संपर्क साधू नये व कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करू नये.पाणी कराचा भरणा करणे किंवा ईतर कोणत्याही प्रकारची बिला संदर्भात अडचणी असल्यास सरळ अकोला महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात येऊन चौकशी करावी. अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा कोणत्याही प्रकारचे वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर णझख व्दारे कराचा भरणा करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिलेली नाही याची शहरातील सर्व नळ धारकांनी नोंद घ्यावी. या संदर्भात मनपा पाणी पुरवठा विभागाव्दारे सायबर सेल येथे तक्रार करण्यात आली आहे. अकोला शहरातील नळ धारकांनी पाणी पट्टी कराचा भरणा हा पाणी पुरवठा विभाग किंवा मनपा प्रशासनाने नेमून दिलेल्या मिटर रीडर यांचे कडे त्यांचा आय कार्ड बघूनच कराचा भरणा करावा तसेच ज्या नागरिकांना कराचा भरणा ऑन लाईन करावयाचा असेल तर त्यांनी https://amcwaterbill.org या अधिकृत संकेत स्थळावरूनच ऑन लाईन कराचा भरणा करण्याचे आवाहन मनपा पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

# लाचखोर वरिष्ठ लिपीक श्रीमती ममता संजय पाटील यांना त्वरील प्रभावाने केले निलंबित

## पोलीस अधीक्षक अकोला यांनी

**अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

सदर प्रकरणात तक्रारदार यांचा धान्य खरेदी विक्रीचा व्यवसाय असुन त्यांचेकडे कमिशन बेसवर काम करणारा कैलास ओमप्रकाश अग्रवाल यांनी माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये तक्रारदार यांच्या अनुमती शिवाय त्यांच्या वेअर हाउस मधील धान्य विकुन तक्रारदाराची फसवणुक केली. त्यावरुन पोलीस स्टेशन रामदास पेठ येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयाचा तपास करणारे अधिकारी यांनी आरोपीस मदत केली म्हणुन त्यांना जामीन मिळाला आहे. करीता सदर अधिका–यावर फौजदारी कार्यवाही करण्यात यावी. अशा आशयाचा तक्रार अर्ज तक्रारदाराने पोलीस अधिक्षक, कार्यालय, अकोला येथे दिला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मा. पोलीस अधिक्षक, अकोला यांचे आदेशावरून मा. अपर पोलीस अधिक्षक, अकोला यांनी चौकशी करून अहवाल मा. पोलीस अधिक्षक, कार्यालय, अकोला येथे पाठविला आहे. सदर अहवालावर नोटशिट तयार करून वरीष्ठांना सादर करण्यासाठी वरीष्ठ लिपीक श्रीमती ममता संजय पाटील यांनी २० हजार रूपये लाचेची मागणी केली होती. तडजोडी अंती दिनांक ०६.११.२०२५ रोजी ८ हजार रूपये लाचेची रक्कम मागणी केल्याने त्यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांनी पोलीस अधिक्षक, कार्यालयात सापळा रचुन आलोसे वरिष्ठ लिपीक श्रीमती ममता संजय पाटील नेमणुक आस्थपना विभाग, पोलीस अधिक्षक कार्यालय, अकोला यांना रंगेहात पकडण्यात आले. आलोसे वरिष्ठ लिपीक श्रीमती ममता संजय पाटील यांनी पोलीस खात्यास न शोभणारे वर्तन करून पोलीसांची प्रतिमा मलीन केल्याने त्यांना पोलीस अधिक्षक, अकोला यांनी त्वरीत प्रभावाने निलंबित केले आहे.

पोलीस अधिक्षक, अकोला यांच्या तर्फे आव्हान करण्यात येत आहे की, पोलीस अधिक्षक कार्यालयात कोणत्याही कामासाठी कोणीही पैशाची मागणी करीत असेल तर तक्रारदार यांनी सरळ पोलीस अधिक्षक, अकोला यांच्याशी रोज सायंकाळी ०४.०० वा ते ०६.०० वा दरम्यान प्रत्यक्ष संपर्क साधुन माहीती दयावी.

महासागर

●शनिवार,दि.८ नोव्हेबर २०२५

अकोला

पान ६

# मनपात अधिकारी/कर्मचाऱ्यांद्वारे सामूहिक गान

**अकोला :** दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी वंदे मातरम या गीतास १५० वर्ष पुर्ण होत आहेत. सर्व जनमानसात देश भावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्वाची भुमिका बजावलेली आहे म्हणून राज्य शासनाच्या निर्देशानुसार आज दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे, मनपाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालये, मनपा वैद्यकीय आरोग्य विभाग कार्यालय तसेच मनपाच्या शाळांमध्ये अधिकारी/कर्मचारी आणि शालेय विद्यार्थ्यांव्दारे  वंदे मातरम गीताचा सामुहिक गान करण्यात आला आहे.



### अकोला पोलीस दलातर्फे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भाने मासिक गुन्हे आढावा परिषद संपन्न

# निवडणुका पारदर्शक,निष्पक्ष,शांततेत,निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी अकोला पोलीस दल पूर्णपणे सज्ज

**▪अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

७ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलीस अधीक्षक श्री अर्चित चांडक यांचे मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भाने मासिक गुन्हे आढावा बैठक विजय हॉल अकोला येथे आयोजीत करण्यात आली सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी व सर्व पोलीस स्टेशन प्रभारी तसेच शाखा प्रभारी हे उपस्थित होते.

बैठकी दरम्यान महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुका – २०२५ ची घोषणा केली असून, दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुका पारदर्शक, निष्पक्षपणे, शांत, निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी अकोला पोलीस दल पूर्णपणे सज्ज आहे. राज्य निवडणूक आयोग व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या आदेशान्वये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस विभागाने खालीलप्रमाणे व्यापक उपाययोजना हाती घेतल्या आहेत: १. प्रतिबंधात्मक कारवाई – जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार, गुंड प्रवृत्तीचे लोक, फरार व पाहिजे असलेले आरोपी, तसेच जामीन किंवा पॅरोलवर सुटलेले गुन्हेगार यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून त्यांच्यावर कठोर



प्रतिबंधात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे. विविध न्यायालयांनी जारी केलेले प्रलंबित वॉरंट व समन्स यांची अंमलबजावणी वेगाने केली जात आहे .२.बेकायदेशीर कृत्यांवर वॉच: अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध (अवैध शस्त्र) व अवैधरित्या दारू (अवैध दारू) तयार करणाऱ्या, विक्री करणाऱ्या व वाहतूक करणाऱ्यांवर छापे टाकून गुन्हे दाखल करण्याची धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. आचारसंहिता कालावधीसाठी शस्त्र बाळगण्यास बंदी घालण्यात आली आहे. सर्व परवानाधारक शस्त्र बाळगणाऱ्या नागरिकांनी त्यांची शस्त्रे तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये जमा करावीत.३. मतदारांवर प्रभाव टाकण्याचे प्रयत्न रोखणे: निवडणुकीत मतदारांना प्रभावित करण्यासाठी रोख रक्कम (रोख रक्कमा), मद्य, किंवा इतर वस्तूंचे वाटप करणे हा गंभीर गुन्हा आहे. अशा प्रकारांवर पोलीस दलाची करडी नजर आहे. मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर (संशयास्पद आर्थिक व्यवहार) लक्ष ठेवण्यासाठी बँका व पतसंस्थांसोबत समन्वय साधला जात आहे. ४. विशेष पथकांची स्थापना: संपूर्ण जिल्ह्यात विविध ठिकाणी 'भरारी पथके' (ऋश्रूळपस डीींवी) आणि 'स्थिर सर्वेक्षण पथके' (डींरींळल डीीिंशळश्रश्ररपलश ढशरा) तैनात करण्यात आली आहेत. ही पथके वाहनांची तपासणी करून रोख रक्कम, दारू व इतर संशयास्पद वस्तूंच्या वाहतुकीवर कारवाई करतील. महत्वाच्या घटना, सभा व मिरवणुका यांचे 'व्हिडीओ सर्व्हेलियन्स' (तळवशे डीीिंशळश्रश्ररपलश) केले जाईल.५. सोशल मीडिया व प्रचार: सोशल मीडिया, पेड न्यूज (झरळव छशुी) व इंटरनेटवर प्रसारित होणाऱ्या मजकुरावर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथक कार्यरत आहे. सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या, अफवा पसरवणाऱ्या किंवा आचारसंहितेचा भंग करणाऱ्या पोस्ट्सवर कायदेशीर कारवाई केली जाईल. ध्वनीक्षेपकाचा (र्ङेीवीशिरज्ञशी) वापर, सभा, मिरवणुका व मालमत्ता विरुपण (उदा. परवानगीशिवाय बॅनर्स, पोस्टर्स लावणे) याबाबतच्या निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केल्यास गुन्हे दाखल केले जातील.

नागरिकांना आवाहन: अकोला पोलीस दला तर्फे सर्व नागरिकांना भयमुक्त वातावरणात मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करत आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रलोभनाला किंवा दबावाला बळी पडू नये. निवडणूक आचारसंहितेचा भंग, मतदारांना लाच देण्याचा प्रयत्न, धाकदपटशा दाखविणे, पैशाचे वा मद्याचे वाटप किंवा अन्य कोणताही बेकायदेशीर प्रकार निदर्शनास आल्यास, नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनशी किंवा खालील जिल्हास्तरीय 'तक्रार निवारण कक्षाशी (ऋीळर्शीरपलश ठशवीर्शीीरश्र उशश्रश्र) / 'पोलीस नियंत्रण कक्षाशी (झेश्रळलश उेपीीेश्र ठो) संपर्क साधावा. पोलीस नियंत्रण कक्ष क्रमांक: ११२ संपर्क क्रमांकावर माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल. मुक्त व निष्पक्ष निवडणुकांसाठी पोलीस दलाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. अशा दिलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करणीबाबत निर्देश देण्यात आले.

## थोडक्यात

### राष्ट्रीय महामार्गावर तिघांना चिरडणाऱ्या ट्रक चालकाला गुजरात येथुन अटक

**अकोला :** सदर प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, दि. २१/१०/२०२५ रोजी रात्री १०/०० वा. चे सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्र ५३ वर बोरगाव मंजु पोलीस स्टेशनच्या हददीतील कुरणखेड जवळील मुनाफ यांचे ढाब्याजवळ अज्ञात ट्रक चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक क १. धिरज शालीकराव सिरसाट २. अश्विनी धिरज सिरसाट व ३.आरीफ खान अहमद खान तिन्ही रा. बोरगाव मंजु यांचे मरणास व जखमी नामे अनवार खान अब्दुल खान रा. बोरगाव याला गंभीर जखमी करणास कारणीभुत ठरला व घटनास्थळावर फरार झाला होता. सदर प्रकरणात फिर्यादी नामे – शालीकराम व्यंकट सिरसाट वय ६५ वर्ष धंदा – मजुरी रा. भिम नगर बोरगाव मंजु ता. जि. अकोला यांचे रिपोर्ट वरून अज्ञात वाहन चालका विरूध्द अपराध क्रमांक ३४१ / २०२४ कलम २८१, १०६ (१), १२५ (अ) बि एन एस सहकलम १३४, १८४ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर गुन्हा दाखल होताच मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. बि चंद्रकांत रेडडी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, मुर्तिजापूर श्रीमती वैशाली मुळे यांचे मार्गदर्शनाखाली अज्ञात आरोपी वाहन चालकाचा शोध घेणे कामी बोरगाव मंजू पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ यांनी तपासाची चक्रे फिरवली तपास अधिकारी पोउपनि ज्ञानेश्वर लांडे, पो. कॉ. सचिन सोनटक्के ब.न. २४०, पो. कॉ. अक्षय देशमुख ब.न. २२९३, पो.कॉ. शेखर कोद्रे ब.न. २४७१, पो. कॉ. पंकज बोराखडे ब. न. २४८९ तसेच सायबर पो.स्टे. चे अंमलदार गोपाल ठोंबरे यांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रीक तपासाव्दारे आरोपीचा कसून शोध घेवुन अपघात करणारा आरोपी ट्रक चालक अझरूददीन इद्रीशमिया वय २५ वर्ष रा. कमरहटटी नॉर्थ परगणा, २४ वेस्ट बंगाल यास ट्रक क्र WB २३ D ८३०६ सह राज्य गुजरात येथुन ताब्यात घेतले.

### प्रभातच्या १८ खेळाडूंची क्रिकेटमध्ये विभागस्तरावर निवड



**अकोला :** प्रभात किड्स स्कूलच्या १८ खेळाडूंनी जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादीत केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन अकोला क्रिकेट क्लब, अकोला येथे दि. ६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान करण्यात आले होते.जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत १७ वर्षाआतील मुलांमध्ये सुज्वल चव्हाण, सोहम पोरे, अथर्व आखरे, आराध्य शेळके, आशुतोष वाघ, संदेश अग्रवाल, यजत चंदनबटवे, प्रथम गोरे, केयुर म्हैसने, पियुष अग्रवाल, राजवीर बुंदेले, सार्थक पुसदकर, विराट अहिर, विराज कडू, शर्वील जाधव, पार्थ बकाल तसेच १४ वर्षाआतील मुलांमध्ये आशिष गावंडे व अकुल मोरे या खेळाडूंनी उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे. या सर्व विजयी खेळाडूंना प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक अभिजीत कर्ने यांचे मार्गदर्शन लाभले.प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ व क्रीडा विभागप्रमुख स्वप्निल मांदाळे व क्रीडा उपविभागप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचांयांनी विजयी खेळाडूंचे कौतुक केले असून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शहरातील सिग्नल यंत्रणा कोलमडली

## सिग्नल यंत्रणा सुरळीत करण्याची सामाजिक कार्यकर्ते यांची मागणी

**▪अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

शहराची लोकसंख्या तसेच वाहनांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र, शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च करून बसविण्यात आलेली सिग्नल प्रणाली गेल्या बऱ्याच दिवसापासून बंद पडलेली असून, ती केवळ नावालाच उरली आहे. लक्झरी स्टॅण्ड पत्रकार चौकातील सिग्नल खांब पुर्णपणे वाकला असुन कधीही कोसळण्याच्या स्थितित असून,लक्झरी स्टॅण्ड चौकांतील वाहतूक विस्कळीत झाली आहे. लक्झरी स्टॅण्ड सोडून राष्ट्रीय महामार्गावर अनधिकृतपणे उभ्या राहणाऱ्या लक्झरी मुळे लक्झरी स्टॅण्ड  चौकात अनेकदा वाहतूक कोंडी निर्माण होत असते.तसेच वाशिम बायपास चौकात नव्याने सुरू करण्यात आलेले सिग्नल आठ दिवसांतच बंद पडलेले




आहेत त्यामुळे या चौकात खूप मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. शहरातील सिग्नल प्रणालीची कोणत्याही टप्प्यावर वेळोवेळी देखभाल करण्यात न आल्याने शहरातील सिग्नल यंत्रणा बंद पडलेली असते. परिणामी, या ठिकाणी वाहतूक सुरळीत ठेवण्याचे प्रयत्न अपुरे ठरत आहेत. वाहतूक शिस्त, नियमन आणि अपघाती घटनांवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न निष्फळ ठरण्याची शक्यता आहे.नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि वाहतुकीच्या शिस्तीसाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत. अन्यथा सिग्नल यंत्रणेवर झालेला कोट्यवधींचा खर्च व्यर्थ ठरेल, तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे यांनी केली आहे.

# अकोट–हिवरखेड रोडवरील गड्डे भरण्याच्या कामात बोगसबाजीचा मोठा प्रकार

## अधिकारी बेपत्ता, जनतेचा संताप उफाळला

**▪अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

अकोट–हिवरखेड रोडवरील गड्डे भरण्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. गड्ड्यांमध्ये योग्य दर्जाचे साहित्य न वापरता फक्त माती आणि दगड भरून काम उरकले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.संबंधित इंजिनियर बोगस डिग्रीधारक



असल्याचा स्थानिक नागरिकांचा आरोप आहे. इंजिनियर सुट्टीवर असतानाही काम सुरू आहे, मात्र त्या कामावर कोणतीही तांत्रिक देखरेख नसल्याने रस्त्यांवर पुन्हा दगड व माती उडून नागरिकांना धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावरून जाणाऱ्यांना उडणाऱ्या दगडांचा फटका बसत असून अपघाताची शक्यता वाढली आहे.नागरिकांनी जेव्हा तक्रार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात धाव घेतली, तेव्हा ‌‌साहेब अमोल पवार सुट्टीवर आहेत, आम्ही ऑफिसर नाही‌ असे सांगून कर्मचाऱ्यांनी जबाबदारी झटकली. त्यामुळे जनतेचा रोष आणखी वाढला आहे.

**अकोट :** अकोट नगरपरिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, १० ते १७ नोव्हेंबर या दरम्यान उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडेल.

# ई.पि.एस ९५ पेन्शनरांनो आपल्या हक्काची पेन्शनवाढ पदरात पाडुन घेण्यासाठी प्रचंड संख्येने दिल्लीला चला : देवराव पाटील

**▪अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

आज ई. पि. एस ९५ पेन्शनरांची बैठक स्वराज्य भवन अकोला येथे संपन्न झाली. बहुसंख्य पेन्शनरांच्या उपस्थितीत बैठकीला सुरुवात होवुन सभेचे प्रास्तावीक रमेश गायकवाड तर संचलन गोपाल मांडेकर यांनी केले. संघटनेचे जेष्ठ पेन्शनर अंबादास भरणे,मुकुंदराव गावंडे व नारायणराव अंधारे यांनी समोयोचीत मार्गदर्शन करुन पेन्शनरांना आंदोलनात सहभाग घेण्याचे आवाहन केले. अध्यक्ष देवराव पाटील यांनी आपल्या भाषणात केंद्र सरकारवर कडाडुन हल्ला करतांना सांगितले की, केंद्र सरकार पेन्शनरांची क्रूर थट्टा करीत असल्याचा आरोप करुन गेल्या ११ वर्षात पेन्शनरांच्या पेन्शनमध्ये एक कवडीचीही वाढ न करता समित्यावर समित्या नेमुन पेन्शनरांची घोर फसवणुक करीत आहे . आमच्या पेन्शनफंडावर मिळाणाऱ्या व्याजाचा वाटा सुध्दा देण्याची मानसिकता केंद्र सरकार करीत नसुन त्यामुळे फसवणुकीची परतफेड करण्याची वेळ आली असुन केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आपली ताकद उपद्रव मुल्या मार्फत दाखवुन देण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. त्याचा एक भाग म्हणुन येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकामध्ये म्हणजेच नगरपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परीषद, व महापालीका च्या निवडणुकीत आपल्या मताचा अधिकार भाजपा व त्यांच्या मित्र पक्षाच्या विरोधात वापर करुन आपली ताकद दाखवुन देण्याचे आवाहन पेन्शनरांना केले. कारण नाक दाबल्याशिवाय तोंड उघडणार नाही. याची खात्री असल्यामुळे जास्तीस जास्त पेन्शनरांनी दिल्लीच्या आंदोलनात सहभाग नोंदवावा असे आवाहन आपल्या भाषनातुन केले. शेवटी धर्मराज सरोदे यांनी उपस्थितीतांचे आभार मानले. सभा यशस्वी करण्यासाठी वसंतराव उजाळे,प्रल्हाद पाटील घोगरे, चोरे, केशव काठोळे, घनबहादुर, आर. एम. काटोले, संजय मालोकार व्ही. ए. देशमुख, पि. के. देशमुख ग्याने, शिंदे, ड़ि एन. पंत, मेहरे, चंद्रकांत अवचार सी. के. अंबेरे इत्यादींनी केले आहे.

# भुसावळ रेल्वे विभागाला दिवाळीत १३८.७२ कोटींचे उत्पन्न

**▪अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**

अकोला–भुसावळ रेल्वे विभागाने ऑक्टोबर महिन्यात विविध स्त्रोतांमधून उत्पन्नामध्ये लक्षणीय वाढ नोंदवली आहे. या कालावधीत विभागाने उत्कृष्ट कामगिरी करत १३८.७२ कोटींचे महसूल मिळवले आहे. जे ऑक्टोबर २०२४ च्या तुलनेत १५% अधिक आहे. यंदा ऑक्टोबर महिन्यात दिवाळी आली. २१ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीपूजन पार पडले. त्यानंतर गावाकडे सुट्टीचा आनंद घेण्यासाठीप्रवाशांनी रेल्वेवर गर्दी केली होती. पूर्ण महिनाभर वाहनांमध्ये गर्दी दिसून आली.

**CHANGE IN NAME**

I have change my name from **RAVINDRA FULCHAND POTDAR to RAVINDRA FULCHAND PODDAR Passport No N7936990** Address - 75 Near Siddhi Vinayak Mangal Karyalay, Ram Nagar, Akola Maharashtra, 444001

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in **My Passport :- (F0400054)**
-------From----------
**SAIDUR RAHMAN KHAN MUBEEN UR RAHMAN KHAN**
---------TO------------
**MUBINUR RAHMAN KHAN SAEEDUR RAHMAN KHAN**
My Residential Address is :- Behind Ru Afza School Mohammad Ali Road Baidpura Akola 444001

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Educational Documents
-------From----------
**CHANDRASHEKHAR SHIVAJI MANGATE**
---------TO------------
**CHANDRSHEKHAR SHIVAJI MANGTE**
My Residential Address is :- At Post Vyala Tq. Balapur Dist. Akola 444302.

# तुळसाबाई कावल विद्यालयाचे विद्यार्थी राज्यस्तरावर

**▪पातुर,दि ७ (प्रतिनिधी) :**

तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथील विद्यार्थी मैदानी स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर विभागाचे नेतृत्व करतील. क्रीडा व युवक संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने २९ व ३० ऑक्टोबरला घेण्यात आलेल्या विभागीय मैदानी स्पर्धेमध्ये तुळसाबाई कावल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे. चिपळूण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ते पात्र झाले आहेत. १) सुमेध विजय गवई ४००। हर्डल्स द्वितीय क्रमांक प्राप्त करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला तसेच  समर्थ विनोदी इंगळे उंच उडी मध्ये तृतीय क्रमांक मिळवला ४✻१०० रिले स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.पूर्वेश धम्मचक्र उपरवटकरण गवई सुमेध गवई  आनंद गावंडे प्रेम केवट या खेळाडूंनी आपले नाव राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये कोरले आहे. ‌विजय तुमच्यासाठी त्याच वेळी शक्य आहे, जेव्हा तुम्ही त्यासाठी कार्य कराल.‌ असे कौतुकास्पद विचार बेरार एज्युकेशन सोसायटी पातुरचे व्यवस्थापक श्री विजयसिंह गहिलोत यांनी काढले.‘जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक विचार, मेहनत आणि योग्य प्रेरणा हे महत्त्वाचे घटक आहेत. हे प्रेरणादायी विचार तुमचं जीवन उजळवतील आणि तुम



च्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी नवी उमेद देतील.‘खेळाडूचे कौतुक करत असताना विद्यालयाचे प्राचार्य श्री अंशुमान सिंह गहिलोत यांनी अशा प्रकारचे वक्तव्य खेळाडूंसाठी केले, ज्यामुळे खेळाडूंचा उत्साह आणि जिंकण्याची ओढ आणखीन वाढेल.विजय खेळाडूचे कौतुक बेरार एज्युकेशन सोसायटी पातुर चे व्यवस्थापक श्री विजयसिंह गहिलोत, सौ स्नेह प्रभादेवी गहिलोत सचिव, प्रार्चा अंशुमान सिंह गहलोत, एस बी चव्हाण उपप्राचार्य, उपमुख्याध्यापिका आर एस ढेंगे पर्यवेक्षिका पी एम. कारस्कर, पर्यवेक्षक एस आर मुखाडे, क्रीडाशिक्षक डी एम राणे व एस आर खाडे यांनी केले.

# लाडकी बहिण लाभार्थ्यांनी ई–केवायसी पूर्ण करावी

## महिला व बालविकास अधिका-यांचे आवाहन

**▪अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :**जिल्ह्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांनी ई–केवायसी पूर्तता करून घेण्याचे आवाहन जिल्हा महिला बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.योजनेचा लाभ मिळण्यासाठी ई–केवायसी पूर्ण असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व संबंधित लाभार्थ्यांनी दि. १८ नोव्हेंबरपूर्वी ई–केवायसी पूर्ण करून घ्यावी असे आवाहन श्री. पुसदकर यांनी केले आहे.

# रब्बी हंगामासाठी कृषि विद्यापीठात उच्चप्रतीचे हरभरा बियाणे उपलब्ध!

**अकोला :** डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला निर्मित विविध हरभरा वाणांचे अधिशेष ब्रिडर बियाणे शेतकऱ्यांकरिता सत्यप्रत स्वरुपात लागवडी करिता उपलब्ध करून देण्यात आले आहे. शाश्वत उगवण क्षमता, सर्वोत्तम गुणवत्ता व अनुवंशिक शुद्धता बाबतीत उच्च दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांनी विद्यापीठातुन खरेदी करावे असे आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ यांचे मार्फत  करण्यात येत आहे यंदा विद्यापीठद्वारे जाकी–९२१८ पिडीकेव्ही कनक  पिडीकेव्ही कांचन या अतिशय लोकप्रिय हरबरा वाणाचे सत्यप्रत बियाणे विक्रीसाठी उपलब्ध आहे, या संधीचा शेतकरी बांधवानी फायदा घ्यावा. बियाणे उपलब्धी बाबत डॉ निलेश मोहोड, उपसंचालक प्रक्षेत्र व प्रभारी, भांडार विभाग मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला यांना  (८७८८२८०१२७) तसेंच राजेश डांगे कृषी सहायक, भांडार विभाग,मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर  (९८५०१०२१५०) यांना संपर्क करावा असेही आवाहन विद्यापीठाचे वतीने करण्यात येत आहे.

RNI NO-46973/1986

Mahasagar Akola

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८

महासागर अकोला

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, िमला स्क्रेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# शहरीकरण : विकासाचे क्षितिज की सामाजिक संतुलनाचे आव्हान



दरवर्षी ८ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक शहरीकरण दिन म्हणून पाळला जातो. आधुनिक मानवसभ्यतेपुढील सर्वांत वेगाने घडणाऱ्या सामाजिक प्रक्रियांपैकी शहरीकरण ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. शहरांचा विस्तार, लोकसंख्येचे स्थलांतर, जीवनशैलीतील बदल, पर्यावरण-विकासातील संघर्ष, अर्थव्यवस्थेतील नवीन संरचना आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेचा पुनर्विचार यांद्वारे शहरीकरण मानवी समाजाचे भविष्य ठरवत आहे. आज जगातील ४० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शहरी भागात राहते आणि पुढील काही दशकांत ही संख्या ७० टक्क्यांपर्यंत पोहोचेल, असे तज्ज्ञ मानतात. अशा परिस्थितीत शहरीकरणाचा अभ्यास केवळ भौगोलिक किंवा आर्थिक विषय नसून मानवी जीवनाच्या समग्र परिवर्तनाची प्रक्रिया म्हणून पाहण्याची गरज आहे.

--------------

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शहरीकरण समजून घेताना आपल्याला व्यक्ती, कुटुंब, समुदाय, संस्था, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक संरचना, सामाजिक समस्या या सर्व स्तरांकडे एकत्र पाहावे लागते. कारण शहरीकरण हे केवळ माणूस कुठे राहतो याचा प्रश्न नसून माणूस कसा राहतो, कसा विचार करतो, आणि कशातून आपली सामाजिक ओळख घडवतो याचा प्रश्न आहे.

शहरीकरणाची प्रक्रिया पाहताना सर्वप्रथम लक्षात येते ते म्हणजे ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे झपाट्याने होणारे स्थलांतर. ग्रामीण भागातील रोजगाराच्या मर्यादित संधी, शेतीवरील अवलंबन, शेती उत्पन्नातील अस्थिरता, शिक्षण आणि आरोग्य सुविधा अपुऱ्या असणे, तसेच आधुनिक जीवनशैलीकडे आकर्षण या कारणांमुळे लोक शहरांमध्ये संधींच्या शोधात येतात.

शहर व्यक्तीला नवीन ओळख, आर्थिक स्थैर्य, कौशल्यविकास आणि प्रगतीची संधी उपलब्ध करून देते. विशेषतः युवकांसाठी शहर स्वप्नपूर्तीचे केंद्र ठरते. शिक्षण संस्था, उद्योग, आय टी कंपन्या, व्यावसायिक क्षेत्रे, सर्जनशील उपक्रम आणि उद्यमशीलतेच्या संधी यामुळे शहर आधुनिक उन्नतीचा प्रतीक बनते. स्त्रियांसाठी विशेषतः शहराने शिक्षण, रोजगार आणि स्वावलंबनाच्या दृष्टीने नवे दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे शहरीकरणाने स्त्री-पुरुष समानतेच्या चळवळीला नवीन गती दिली आहे.

परंतु शहरीकरणाचे वास्तव इतके सरळसोपे नाही. संधींसोबतच शहरात आव्हानांचे प्रचंड जाळेही आहे. शहर म्हणजे चमकणारे दिवे, उंच इमारती, व्यस्त रस्ते आणि गतिमान वाहतूक होय. परंतु या चमकाखाली संघर्ष, असमानता, तणाव आणि अस्थैर्याचे वास्तव दडलेले असते. ग्रामीण भागातून शहरात आलेल्या बहुसंख्य लोकांना परवडणारी घरे मिळत नाहीत.

शहरातील जमीन महाग आणि मर्यादित असल्याने झोपडपट्ट्या विकसित होतात. झोपडपट्टीकरण हे शहरीकरणाचे मोठे सामाजिक आव्हान आहे. अरुंद घरं, गर्दी, अस्वच्छता, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा अभाव, आरोग्यसेवा अपुरी, वाहतूक आणि शिक्षणाच्या मर्यादित सुविधा यामुळे शहराचा विकास एकतर्फी आणि विषम वाटू लागतो.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

एका बाजूस गगनचुंबी इमारती आणि आलिशान सोसायट्या, तर दुसऱ्या बाजूस झोपड्या ही दृश्यगती शहरीकरणातील सामाजिक विषमतेचे प्रतीक बनते.

समाजशास्त्राच्या भाषेत शहर हा द्व्यक्तिनिष्ठ समाज मानला जातो. ग्रामीण समाजात नाती, परस्परसहकार्य, शेजारधर्म आणि वृत्तीतील एकोप्याला महत्त्व असते. परंतु शहरात व्यक्तीची जीवनशैली अधिक स्पर्धात्मक, वेगवान आणि एकाकी होते.

कामाचा ताण, वेळेचे बंधन, करिअरची धडपड, आर्थिक खर्चाचा दबाव यामुळे सामाजिक नात्यांची उब कमी होते. कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीनेही शहरीकरणाचे परिणाम खोलवर आहेत.

संयुक्त कुटुंबे कमी होत गेली आणि विभक्त कुटुंब प्रबळ झाले. पालक आणि मुलांमधील संवादाचे स्वरुप बदलले. ज्येष्ठ आणि बालक सांभाळण्याची जबाबदारी वाढली. वृद्धांची सामाजिक स्थानिक ओळख कमी झाली. तरुण पिढी आधुनिक विचारसरणी अंगीकारताना परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यसाखळी यांच्यात अंतर वाढू लागले.

सांस्कृतिक स्तरावर शहर जागतिक संस्कृतीचे प्रवेशद्वार बनले आहे. फॅशन, ग्लोबल मीडिया, मनोरंजन क्षेत्र, डिजिटल संस्कृती, उपभोक्तावाद आणि ब्रँड ओळखीमुळे व्यक्तीचे आत्ममूल्य उपभोग क्षमतेवर आधारित होत चालले आहे. समाजात प्रतिष्ठा, सन्मान आणि ओळख यांचे अर्थ बदलत आहेत.

आजचा माणूस असण्यात कमी आणि दिसण्यात अधिक गुंतला आहे. त्यामुळे जीवनातील समाधानाचा स्रोत वस्तूंमध्ये, अनुभवांमध्ये आणि बाह्यकेंद्रित यशात शोधला जात आहे. त्यामुळे मानसिक आरोग्यावरही शहरीकरणाचे गंभीर परिणाम दिसून येतात. तणाव, नैराश्य, एकटेपणा, स्पर्धा, असुरक्षितता आणि भावनिक अस्थिरता हे शहरी जीवनाचे छुपे साथीदार झाले आहेत.

शहरीकरणाचे आणखी एक मोठे आव्हान म्हणजे पर्यावरणीय असंतुलन होय. शहरांचा विस्तार म्हणजे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण होय. जंगलांची तोड, नदी आणि नाले बुजवणे, वाहनांची वाढ, रासायनिक उत्सर्जन, प्लास्टिक कचरा, पाणी, ध्वनी आणि हवा प्रदूषण यामुळे शहरांचे पर्यावरण अस्वस्थ झाले आहे.

पावसाळ्यात शहरी पूर, उन्हाळ्यात पाण्याची टंचाई, हवेच्या गुणवत्तेत घट, उष्ण बेट प्रभावामुळे तापमान वाढ आणि ऋतुचक्रात विसंगती असे परिणाम सर्वत्र दिसतात. अशी परिस्थिती मानवाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करते. तरीही, शहरीकरणाचे सकारात्मक पैलूही तितकेच ठळक आहेत. शहर ही प्रगतीची प्रयोगशाळा आहे.

येथे विविध भाषा, संस्कृती, धर्म, परंपरा, विचारधारा आणि जीवनशैली एकत्र येतात. त्यामुळे शहरात विविधतेतून नवी सामाजिक रचना निर्माण होते. शिक्षण संस्थांमुळे वैज्ञानिक दृष्टी वाढते, संशोधन व नवकल्पना घडतात, कला-साहित्य-नाट्य-संगीत-विचार यांची देवाणघेवाण होते. मानवाधिकार, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, युवा सहभाग अशा आधुनिक चळवळी शहरांतूनच गतिमान झाल्या आहेत. शहर कल्पनांना उलगडते, व्यक्तिमत्त्व घडवते आणि स्वप्ने जगण्याची संधी देते.

म्हणूनच, प्रश्न शहरीकरणाचा विरोध करण्याचा नाही; तर त्याला योग्य दिशादर्शन देण्याचा आहे. शहरी विकास सर्वसमावेशक, पर्यावरणपूरक, मानवी मूल्यांवर आधारित आणि सामाजिक न्याय साधणारा असायला हवा. शहरांची रचना माणूस-केंद्रित असावी; केवळ पायाभूत सुविधांवर आधारित नाही.

सार्वजनिक वाहतूक, परवडणारी घरे, स्वच्छता, आरोग्य सुविधा, हरित क्षेत्र, पादचारी व सायकल मार्ग, सांस्कृतिक खुली मैफिली, सामुदायिक संवादाची जागा ही सर्व शहराच्या आरोग्यासाठी तितकीच आवश्यक आहेत जितकी उद्योग आणि तंत्रज्ञान आवश्यक आहे.

जागतिक शहरीकरण दिनाचे महत्त्व हेच की आपण शहरांच्या वाढीला फक्त वेग द्यायचा नाही, तर दिशा द्यायची आहे. शहर विकसित व्हावं, पण त्याचसोबत नाती, भावना, पर्यावरण, सामाजिक न्याय आणि मानवी सन्मान यांचे संरक्षण व्हावे. शहर उंच व्हावं, पण माणसाचं मनही उंच राहिलं पाहिजे. शहरांनी समता आणि मानवतेचा स्पर्श न हरवता संधी दिल्या पाहिजेत.

शेवटी, शहर हे केवळ भौगोलिक जागा नसून मानवी जीवनाचा स्पंदनबिंदू आहे. शहरांनी जर माणसाला सहकार्य, संवेदना, विश्वास आणि परस्परसंबंध यांसह जगायला शिकवले तरच शहरीकरण खऱ्या अर्थाने मानव सभ्यतेच्या विकासाचा दीपस्तंभ बनेल. अन्यथा, शहरीकरण प्रगतीच्या नावाखाली मानवी आत्म्याला निर्जीव करणारा प्रवास ठरू शकतो.

म्हणूनच आजच्या या जागतिक शहरीकरण दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या शहरांकडे फक्त ह्वारचनाह्व म्हणून नव्हे, तर जीवनशैली, संस्कृती आणि मानवी संबंधांचे घर म्हणून पाहण्याची संवेदनशीलता जपली पाहिजे.

# सायबर फसवणुकीपासून सावधान!

(कालच्या अंकावरून पुढे)

------------------

कधीकधी, जलद पेमेंट करण्यासाठी ऑफरचा वापर केला जातो. म्हणून, कोणतेही पेमेंट करण्यापूर्वी, वेबसाइट खरी आहे का आणि उत्पादन खरोखर उपयुक्त आहे का ते तपासा.

**फिशिंग आणि व्हायरसपासून सावध रहा**

लोक बनावट वेबसाइट किंवा लिंक्स ईमेल किंवा मेसेजद्वारे पाठवतात ज्या ख?्या दिसत असतात. त्यावर क्लिक करू नका आणि तुमची माहिती भरू नका. ख?्या बँका कधीही तुमची वैयक्तिक माहिती विचारून फोन किंवा ईमेल करत नाहीत.

**तुमचे कार्ड कधीही नजरेआड होऊ देऊ नका**

जर तुम्ही तुमचे कार्ड रेस्टॉरंट किंवा पेट्रोल पंपावर देत असाल, तर ते तुमच्या समोर स्वाइप केले आहे याची खात्री करा. जर मशीन विचित्र वाटत असेल तर सावधगिरी बाळगा.

**एक कार्ड ऑटोपेसाठी आणि दुसरे दैनंदिन वापरासाठी ठेवा**

ऑनलाइन बिलांसाठी किंवा सबस्क्रिप्शनसाठी एक वेगळे कार्ड ठेवा आणि दैनंदिन खर्चासाठी दुसरे कार्ड ठेवा. अशा प्रकारे, जर एक कार्ड चोरीला गेले तर दुसरे सुरक्षित राहील.

**मोबाईल वॉलेट वापरा**

गुगल पे, फोनपे किंवा पेटीएम सारखे मोबाईल वॉलेट अधिक सुरक्षित असतात कारण ते फिंगरप्रिंट किंवा पासवर्डने संरक्षित असतात आणि कार्ड तपशील शेअर केले जात नाहीत.

**व्यवहार मर्यादा सेट करा**

तुमच्या कार्ड मयार्दा (जसे की एटीएम, ऑनलाइन किंवा स्टोअर खरेदी) कमी ठेवा. हे तुम्हाला आपोआप जास्त पैसे खर्च करण्यापासून रोखेल.




काही आर्थिक तपशील आहेत जे कधीही कोणासोबतही शेअर करू नयेत. जरी बँक अधिकारी, कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह किंवा तुमच्या ओळखीचा कोणीतरी असल्याचा दावा करणारी व्यक्ती बँक कर्मचारी असली तरीही. ही माहिती फक्त तुमच्यासाठी आहे. ती लीक केल्याने तुमचे संपूर्ण बँक खाते किंवा कार्ड रिकामे होऊ शकते.




क्रेडिट कार्डची माहिती लपवणे का महत्त्वाचे आहे? यावर सायबरसुरक्षा तज्ञ राहुल मिश्रा स्पष्ट करतात की ज्याला क्रेडिट कार्डची एक्सपायरी डेट, कार्ड नंबर आणि सीव्हीव्ही नंबर माहित आहे तो ऑनलाइन शॉपिंग करण्यासाठी आंतरराष्ट्रीय गेटवे वापरू शकतो. म्हणून, हे कार्ड तपशील लपवणे महत्वाचे आहे.

मॉल आणि पेट्रोल पंपांसारख्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधून क्रेडिट कार्डची माहिती चोरीला जाण्याचा धोका अनेकदा असतो. हे टाळण्याचा एक चांगला मार्ग म्हणजे सीव्हीव्ही नंबर लपवणे किंवा कायमस्वरूपी मार्करने तो ब्लॉक आउट करणे.

बँका कार्ड ब्लॉकिंग किंवा पडताळणीबद्दल बोलण्यासाठी फोन करतात का? हा प्रश्न अनेकांना पडतो. तर त्याचे उत्तर नाही असे आहे. बँका कधीही फोन करून तुमचे कार्ड ब्लॉक करण्याची धमकी देत नाहीत, तसेच पडताळणीच्या नावाखाली तुमचे कार्ड किंवा ओटीपी मागत नाहीत. असे करणारे १००% फसवे आहेत. जर तुम्हाला कॉल आला तर ताबडतोब फोन बंद करा आणि बँकेच्या वेबसाइटवरून नंबरची पडताळणी करा.

आंतरराष्ट्रीय वेबसाइटवर कार्ड वापरणे सुरक्षित आहे का? यावर तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, जर वेबसाइट विश्वसनीय आणि सुरक्षित असेल (https:// सह), तर हो, परंतु फसव्या साइट्सवरील व्यवहार टाळा. आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी तुमच्या कार्डची मर्यादा मर्यादित करा आणि बँक अलर्ट चालू ठेवा.

कार्ड वापरल्यानंतर व्यवहार इतिहास तपासणे आवश्यक आहे का? यावर सायबरसुरक्षा तज्ञ राहुल मिश्रा म्हणतात, होय, प्रत्येक क्रेडिट कार्ड वापरकर्त्याने महिन्यातून एकदा त्यांचे स्टेटमेंट तपासले पाहिजे. यामुळे कोणतेही संशयास्पद व्यवहार लवकर ओळखण्यास मदत होते.

■ ■ ■

# 'अजात' चे मॉडेल जगाला देणारे समाज सुधारक गणपती महाराज





समाजसुधारक श्री संत गणपती ऊर्फ हरि महाराज

एक जात मानवांची। आहे देवाघरची' असे लोकांच्या मनी त्यांनी रुजविले. अठरापगड जातीच्या लोकांनी जातीची बंधने झुगारून गणपती महाराजांनी निर्माण केलेल्या 'श्वेत निशाणधारी मानव संस्थे'त प्रवेश केला.

आणि अजात असे देव तो जाणा
असे सदा म्हणती पंथ नाना
बाप अजात ज्याचा, त्या लेकरा जात
गण्या म्हणे कोठून आली जगात?

असे परखड विचार व्यक्त करणारे श्री संत गणपती उर्फ हरि महाराज यांची कर्मभुमी असलेले मंगरूळ दस्तगीर ता. धामनगाव (रेल्वे) जि. अमरावती मध्ये कार्तिक यात्रा महोत्सव सुरु असून भारतात वास्त्यव्य करीत असलेले त्यांचे शिष्य असणारे या महोत्सवात सहभागी होतात. त्यांचे जन्मगाव काचनुर, ता. आर्वी, जि. वर्धा.

त्यांनी श्वेत निशाणधारी अजात मानव संस्था काढून सर्व जाती पथांचे लोक एकत्र केले. ज्या स्वातंत्र्यपूर्व काळात स्पृश्य अस्पृशाचा विटाळ होता. त्या काळात सर्व जातीच्या लोकांना एकत्र आणून मंगरूळ मधील स्वतः बांधलेले विठ्ठल रुख्मिणीचे मंदीर सवार्साठी खुले केले.

त्यावेळी ब्राम्हण समाजानी त्यांचा विरोध केला. परंतु ते कोणालाही न जुमानता मनुष्य आणि स्त्री ही एकच जात आहे. हे त्यांनी पटवून दिले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अगोदर होऊन गेलेल्या गणपती महाराज व त्यांनी स्थापन केलेल्या 'श्वेत निशानधारी मानव संस्थेवर, त्यांनी जीवनभर जोपासलेल्या कार्यावर आणि तत्वज्ञानावर प्रकाश टाकला. गणपती महाराजांचे श्रेष्ठत्व असमान्य पातळीवरचे होते.

जातीव्यवस्थेच्या विरोधात, अनिष्ठ रूढी-परंपरेच्या विरोधात, चातुर्वणाच्या विरोधात बंड पुकारून समाज जीवन पेटविण्याचा यशस्वी प्रयत्न गणपती महाराजांनी केला. इतकेच नाही, तर नव्या समाज जीवनाला त्यांनी 'अजातचे मॉडेल' जे दिले ते जगाच्या पाठीवर एकमेव ठरलेले आहेत.

उपेक्षितांचे जीवन त्यांना भोगावे लागले. हालअपेष्टा त्यांना सतत समाजाकडून सहन कराव्या लागल्यात, तरीही गणपती महाराजांचे अनुयायी डगमगले नाही. 'अजात' ही जात त्यांनी आपल्या नावासमोर शाळेच्या हजेरी पटावर त्यांच्या सात-बारा उताऱ्यात नमूद केली.

आम्ही सारे अजात आहोत, हे मोठ्या अभिमानाने सांगताना हा श्वेत निशानधारी अजात मानवसमाज आपणास दिसून येतो आहे. आर्थिक दृष्टीने मागास असलेल्या या समाजाच्या अंगी एवढं मोठ बळ कोठून आलं? केवळ गणपती महाराजांनी 'माणूस' ही जात आणि मानवता हा धर्म यातून हे प्रबळ झालं.

आजच्या विषमतावादी समाजासमोर त्यांनी आपला आदर्श स्वाभिमानाने उज्ज्वल केला.




समाजजीवनात कितीतरी वादळे आली. अनेक परिवर्तनेही झाली. स्वाथार्साठी धर्मसंस्कृती, स्वाभिमान विकणाऱ्या गणपती महाराजांच्या 'अजात मॉडेल' ने समानता व मानवतेचा पुरस्कार केला आहे.

मूठभर असलेल्या या अजात मानव समाजाने जे आपले वेगळेपण टिकवून ठेवले, परंतु कुठल्याही प्रकारची शरणागती पत्करली नाही किंवा आपल्या पाठीमागे जातीचे जोखड लावून घेतले नाही. इथेच समाजसुधारक गणपती महाराजांचे सगळ्या समाजसुधारकांमध्ये विशेषत्व आणि वैशिष्ट्य दिसून येते. अठराव्या शतकापासून तर आजपर्यंत ज्यांनी समाजसुधारणेचे कार्य केलेत त्यांनी आपली स्वतःची जात सोडलेली नव्हती.

स्वतःच्या जातीत राहूनच समाजसुधारणेचा, मानव समाजाच्या एकत्रीकरणाचा प्रयत्न केला. समाजातील अनिष्ट रूढी-परंपरेवर वर्णवाद, वर्गवाद, प्रतिष्ठावादावर, मानवसमाजावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारावर प्रखरतेले आघात केलेत. प्रहार केलेत.

समाजसुधारक आगरकर, महात्मा फुले, छत्रपती 'अजात' म्हणून स्वाभिमानाने जीवन जगण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांच्या सेवकांनी केला. शालेय तथा सरकारी खात्यात देखील 'अजात' अशी आपली नोंद केली, 'मानव ही जात अन मानवता धर्म या पलीकडची कोणतीही शिकवण त्यांना मान्य नव्हती.

स्वतःला त्यांनी अजात केले. पटवी जातीच्या मुलीबरोबर मिश्र विवाह अत्यंत साध्या पध्दतीने केला व सेवकांनाही तसे करण्यास त्यांनी भाग गेले. रोटी-बेटीचे व्यवहार जातीच्या आधारावर न होता ते गुजात्मकतत्वाने व्हायला लागलेत.

*'ज्यांची समानवृत्ती झाली।*
*त्यास शिकार गवसली'*

धर्मनिरपेक्ष समाजवादी-मानवतावादी समाजनिर्मितीचे कार्य त्यांनी केले. हिन्दू, मुसलमान, ख्रिश्चन सर्वांनाच महाराजांनी मानवता-समानता यांच्या पंक्तीत बसविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या कायार्मुळे सवर्ण हिंदूंनी, सत्तेशी नाते जोडणाऱ्या व सत्तेत राहणाऱ्यांनी महाराजांच्या अजात मॉडेल मधून आपले पाय काढून घेतले.



अरूण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

खरे म्हणजे अशा दिखाऊ लोकांची, प्रसिद्धीसाठी हपापलेल्या लोकांची आदर्श समाजव्यवस्थेला गरज नसते. हे लोक संस्थेचं किंवा समाजाचं अस्तित्वच नष्ट करून टाकत असतात. अस्पृश्यता निवारण कार्यालया जोडून महिलोन्नती, व्यसनमुक्ती, उद्योगी, चारित्र्यशील समाज निर्माण करण्याचा चंग बांधला.

शिक्षणहीन-उद्योगहीन, स्त्री-पुरुष भेद राखून ठेवणारा समाज त्यांच्या शब्दकोशात नव्हता. स्वाभिमानशून्य असलेला समाज स्वातंत्र्याची स्वप्न बघत असला तरी यशस्वी होऊ शकत नाही, हे ते चांगल्याप्रकारे ओळखून होते.

चातुर्वण्यांच्या विरोधात त्यांनी आपले पावले उचलताच ब्राह्मणांनी त्यांचा कडवा विरोध केला. जातीची चौकट मोडून टाकल्यावर अन मिश्रविवाहाची अट टाकल्यावर जातिभिमान्यांनी महाराजांवर प्रहार करायला सुरुवात केली. त्यांचा संग सोडला, त्यांना विरोध केला, 'अजात' चे मॉडेल मोडून टाकण्याचा चंग त्यांनी बांधला. कनिष्ठ जातीबरोबर जीवन जगण्याचं त्यांना मान्य नव्हतं, कनिष्ठ जातींना आपल्याबरोबरीने वागविण्यास ते तयार नव्हते. शेवटी जो महाराजांबरोबर समाज उरला तो खरा 'अजात' होता. सर्वांना समानतेचे हक्क आणि अधिकार आहेत, हे मान्य करणारा होता. ईश्वराच्या दृष्टीने नव्हे, तर मानवाच्या दृष्टीने सर्व समान आहे. समानतेचे हक्कदार व अधिकारी आहे, असे समजणारा होता.

----------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

## समाधानी राहिलो, तरच आनंदी राहू!

वाचक लिहितात

आजच्या काळात आपण बघतो की जवळजवळ प्रत्येकजण अजून काही तरी हवे या विचारात गुंतलेला असतो. दूरचित्रवाणी, मोबाईल, इंटरनेट, मोठमोठे मॉल या सगळ्यांमधून नवनवीन वस्तूंच्या जाहिराती दिसतात. त्यामुळे मनात मोह निर्माण होतो.

ती खेळणी मला हवी, तो ड्रेस मला हवा, तो मोबाईल मला पाहिजेच! पण या सगळ्यात आपण विसरतो की ,आपल्याकडे जे आहे, ते किती मौल्यवान आहे!

आई-वडील आपल्यासाठी किती कष्ट करतात, किती गोष्टी देवाच्या कृपेने आपल्याला मिळाल्या आहेत! मोह वाढला की मनःशांती हरवते, आणि समाधान नाहीसे होते. हाच संदेश सांगणारी एक सुंदर गोष्ट आहे. एकदा एक भिकारी रोज देवाचं नाव घेत बसायचा. त्याच्या भक्तीने देव प्रसन्न झाले आणि म्हणाले, बाळा, सांग – तुला काय हवं आहे? भिकारी म्हणाला, प्रभू, मला सोन्याच्या मोहरा हव्यात!

देव म्हणाले, ठीक आहे, पण एक अट आहे. मी मोहरा तुझ्या झोळीत ओतत राहीन आणि तू पुरे म्हणेपर्यंत जर एकही मोहर जमिनीवर पडली, तर सगळ्या मोहरांची माती होईल!

भिकारी आनंदाने तयार झाला. देव त्याच्या झोळीत मोहरा ओतू लागले. झोळी भरत गेली, पण भिकारी पुरे म्हणेना. त्याला अजून हवेसे वाटू लागले. शेवटी झोळी ताणली गेली आणि फाटली! सर्व मोहरा जमिनीवर पडल्या आणि मातीमोल झाल्या.

देव म्हणाले, बाळा, समाधान नसेल तर संपत्तीही निरुपयोगी ठरते. समाधानातच सुख आहे. हीच शिकवण यातून मिळते. मोह आणि लोभ आपल्याला कधीही आनंद देऊ शकत नाहीत. त्यामुळे मनुष्य कायम अतृप्त राहतो.

जे मिळालं आहे, त्यात समाधान मानलं की मनःशांती मिळते. आपल्या पालकांबद्दल, देवाबद्दल आणि निसर्गाबद्दल कृतज्ञ राहूया. खरा श्रीमंत तोच ज्याची वृत्ती समाधानी आहे.

■ सौ. रमा देशमुख
नागपूर.



## भारतात चार कारणांनी येतो अनेकांना हार्ट अटॅक

भारतात हृदयाशी संबंधित आजार वाढत आहेत. हायब्लड प्रेशर,कोलेस्ट्रॉल आणि तणावपूर्ण लाईफस्टाईलमुळे लोकांच्या हृदयाचे आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. तज्ज्ञांच्या मते अजूनही तुम्ही तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयी आणि लाईफस्टाईलवर लक्ष दिले नाही तर येत्या वर्षात हृदयाचे आजार आणखीन वाढतील. वेळेच संकेत ओळखून नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. तरच या सायलेंट किलरपासून आपण वाचू शकतो.

**भारतात हार्ट अटॅक वाढत आहेत**

भारतात हार्ट अटॅक मृत्यूचे सर्वात मोठे कारण बनले आहेत. २०१४ ते २०१९ दरम्यान देशात हार्ट अटॅक प्रकरणात सुमारे ५० टक्के वाढ पाहायला मिळत आहे. शहरीकरण, बदलती लाईफस्टाईल, चुकीचा आहार, तणाव, धुमपान आणि डायबिटीश सारखे आजार याची मुख्य कारणे आहेत. हा आजार केवळ आरोग्यापुरता मर्यादित नाही. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्था, कुटुंबाचे स्थैर्य आणि कामकाजावर परिणाम होत आहे.

**हार्ट अटॅक का येतो?**

हृदयाला रक्त पुरवणाऱ्या आर्टरीजमधील रक्ताचा प्रवाह गुठळी आणि किंवा ब्लॉकेजमुळे रोखला जातो, त्यामुळे हृदयाच्या स्नायूपर्यंत ऑक्सिजन पोहचत नाही. काही वेळाने पेशी मरतात. जर वेळीच उपचार मिळाले नाही तर प्राणही जाऊ शकतात. बहुतांश हार्ट अटॅक हे स्ट्रोक आणि हार्ट फेल्युअर अचानक होत नाहीत. त्याचा रिस्क फॅक्ट आधीच आपल्या शरीरात उपस्थित असतात. उदा. हाय ब्लड प्रेशर, हाय कोलेस्ट्रॉल, डायबिटीज, लठ्ठपणा आणि धुम्रपान असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

**शरीरातील चार धोके**

बहुतांशी लोकांना पहिला हार्ट अटॅक अचानक येत नाही. त्याच्यामागे काही सायलेंट रिस्क फॅक्टर लपलेले असते.

**हायब्लड प्रेशर** : बराच काळ असलेले हायब्लड प्रेशर धमन्यांच्या भिंतींना नुकसान पोहचवते.

**कोलेस्ट्रॉल** : रक्तात वाढलेले छळ्छ कोलेस्ट्रॉल आर्टरीजमध्ये फॅटी डिपॉझिट बनवत असतो, त्यामुळे रक्तप्रवाह बाधित होतो.

**ब्लड शुगर वा डायबिटीज** : वाढलेली शुगर रक्ताच्या पेशींना कमजोर करते आणि हार्ट डिसीजचा धोका अनेक पटींनी वाढतो.

**स्मोकिंग** : तंबाखू हार्ट आणि आर्टरीज दोन्हींना नुकसान पोहचवत असतो.

हे सर्व फॅक्टर हळूहळू परिणाम करत असतात. परंतू लक्षण तेव्हा दिसतात जेव्हा धोका वाढलेला असतो. यामुळे नियमित तपासणी करायला हवी.

**हार्ट अटॅकचा धोका कसा कमी करावा?**

बहुतांशी जोखमीला नियंत्रित केले जाऊ शकते. योग्य खानपान, नियमित व्यायाम आणि वैद्यकीय तपासणी हार्ट अटॅकचा धोका बराच कमी केला जाऊ शकतो. यासाठी तुमच्या डाएटमध्ये सुधारणा करा. व्यायाम करा, रोज किमान ३० मिनिटे चाला. धुम्रपान सोडा, तंबाखू सेवन बंद करा यामुळे हार्ट अटॅकचा धोका कमी होतो.

आपल्या आरोग्याची तपासणी आणि काळजी न घेतल्याने बहुतांशी स्ट्रोक आणि हार्ट अटॅक येतात.जर वेळीच तपासणी केली तर डॉक्टर सुरुवातीलाच उपचार सुरु होऊ शकतो. ३० वयाच्या वरील व्यक्तींनी कुटुंबात हार्ट डिसीजचा रेकॉर्ड असेल तर नियमित तपासणी करावी असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### महिलांनो समजून घ्या थोडं..!

सोने नाणे बंद तिजोरीत
लोखंड पडते धुळ खात
मौलीक वस्तूंनी मर्यादा मोडली
तर होईल त्यांचा आत्मघात..!

नसती ओलांडली लक्ष्मण रेषा
तर घडले नसते रामायण
मर्यादेंना पारतंत्र्य समजणे
आत्मघाताचे कारण

तोकडे कपडे घालुन
करू नका देह प्रदर्शन
मुस्लीम भगिनींकडे बघा
थोडे तरी करा अणुकरण..

# परमपूज्य पंडित श्री देव प्रभाकर शास्त्री ' दद्दाजी ' मंदिराचा भव्य प्राण प्रतिष्ठा महोत्सव ११ नोव्हेंबर २०२५ रोजी कटनी, मध्य प्रदेश येथे होणार

**कटनी, मध्य प्रदेश, ७ नोव्हेंबर २०२५:** कटनी शहर सनातन धर्माच्या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक परंपरेने परिपूर्ण एक भव्य उत्सव अनुभवणार आहे, जो सनातन धर्माच्या भक्ति, सेवा आणि एकतेच्या दिव्य भावना व्यक्त करेल.

परमपूज्य गृहस्थ संत गुरुदेव पंडित श्री देव प्रभाकर शास्त्री 'दद्दाजी' यांच्या मूर्तीच्या प्राण प्रतिष्ठाचा भव्य उत्सव ९ ते १३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान दद्दाजी धाम परिसरात मोठ्या भक्तीभावाने आणि भव्यतेने आयोजित केला जाईल.

या पाच दिवसांच्या महोत्सवात देशभरातील हजारो भक्त, संत, आध्यात्मिक आचार्य आणि प्रतिष्ठित पाहुणे एकत्र येतील. या महोत्सवात, संपूर्ण कटनी शहर श्रद्धा, भक्ती आणि भारतीय सांस्कृतिक वारशाचे केंद्र म्हणून प्रकाशित होईल. हा महोत्सव जगभरातील परमपूज्य दद्दाजींच्या लाखो अनुयायांसाठी एक ऐतिहासिक क्षण घेऊन येत आहे हा प्रसंग त्यांच्या गुरूप्रती असलेल्या त्यांच्या श्रद्धा, निष्ठा आणि अढळ भक्तीचे प्रतीक आहे. गुरुदेव दद्दाजींचे सेवा, करुणा आणि मानवतेचे परिपूर्ण जीवन आजही त्यांच्या प्रत्येक अनुयायासाठी मार्गदर्शन आणि प्रेरणास्थान आहे.

या पवित्र महोत्सवाची सुरुवात ९ नोव्हेंबर २०२५ रोजी असंख्य पार्थिव शिवलिंग निर्मिती आणि रुद्राभिषेक सारख्या दिव्य विधींनी होईल. वैदिक मंत्रांच्या प्रतिध्वनीने आणि भक्तीच्या भावनांनी संपूर्ण वातावरण भरून जाईल.

मुख्य प्राण प्रतिष्ठा समारंभ मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता कटनी येथील दद्दाजी धाम येथे विधिवत होणार आहे. उत्सवानंतर कलश यात्रा, हवन, अभिषेक, आरती आणि पूर्णाहुती असे धार्मिक विधी होतील एक एक असा समारंभ जिथे तुम्हाला प्रत्येक क्षणी भक्ती, ध्यान आणि आध्यात्मिक आनंद अनुभवायला मिळेल.

११ ते १३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान वृंदावनचे प्रसिद्ध कथावाचक पंडित इन्द्रेश उपाध्याय महाराज भक्तांना त्यांच्या दिव्य वचनांनी आशीर्वाद देतील. त्यांचे अमृतमयी कथा प्रवचन आणि भजन–कीर्तन दद्दाजी धाम परिसरात प्रतिदिन वाजणार आहे, जे वातावरणाला भक्ति आणि आनंदाने परिपूर्ण करेल.



या पावन प्रसंगी, पंडित मोहित मराल गोस्वामीजी, पंडित अनिरुद्धाचार्यजी, पंडित पुंडलिक गोस्वामीजी आणि रेणुकाजी यांसारख्या पूज्य संतांची सन्माननीय उपस्थिती देखील महोत्सवाला अधिक आध्यात्मिक उंची देईल.

या उत्सवाच्या तयारीबद्दल बोलताना, परमपूज्य दद्दाजीचे एकनिष्ठ भक्त, दद्दाजी मंदिर बांधकाम समितीचे संरक्षक आणि उत्सवाचे मुख्य संयोजक श्री संजय सत्येंद्र पाठक म्हणाले, परमपूज्य दद्दाजीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा हा दाद्दाजींच्या श्रद्धा, सेवा आणि समर्पणाच्या संदेशाने प्रभावित झालेल्या सर्व भक्तांसाठी आध्यात्मिक पुनर्मिलनाचा एक प्रसंग आहे. हे मंदिर शांती, भक्ती आणि सामाजिक एकतेचे दीपस्तंभ बनेल, भविष्यातील पिढ्यांना दाद्दाजींच्या निःस्वार्थ सेवेच्या आणि अढळ श्रद्धेच्या संदेशाने प्रेरित करत राहील.

साधेपणा, सेवा आणि जनकल्याणाचे प्रतीक असलेले गृहस्थ संत म्हणून परमपूज्य दद्दाजींनी आपले संपूर्ण जीवन समाजात श्रद्धा, करुणा आणि सौहार्द पसरवण्यासाठी समर्पित केले.

ज्या काळात हिंदू समाजातील शैव आणि वैष्णव परंपरा वेगवेगळ्या मार्गांनी चालत होत्या, त्या काळात दद्दाजींनी त्यांच्या उल्लेखनीय दूरदृष्टीने त्यांना एकत्र आणले आणि सनातन धर्माची एकता आणि ताकद आणखी मजबूत केली. त्यांच्या शब्दांमध्ये नम्रता, देवाप्रती भक्ती आणि निस्वार्थ समाजसेवेचा गहन संदेश होता, जो आजही भारतात आणि परदेशात लाखो अनुयायांच्या जीवनाचा आधार आहे.

मंदिराच्या बांधकामाची आणि उत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी असलेल्या दद्दाजी शिष्य मंडळाने भाविकांसाठी व्यापक आणि सुव्यवस्थित व्यवस्था केली आहे. भाविकांसाठी निवास व्यवस्था, एक भव्य अन्न वितरण केंद्र, सेवा समित्या आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांची सुयोग्य आखणी करण्यात आली आहे. जेणेकरून प्रत्येक भाविक या अविस्मरणीय आणि आयुष्यात एकदाच अनुभवता येणाऱ्या दिव्य सोहळ्यात पूर्णपणे सहभागी होऊ शकेल.

या भव्य मंदिराच्या बांधकामाचे आणि प्राण प्रतिष्ठा महोत्सवाचे आयोजन करणारे दद्दाजी मंदिर निर्माण समिती, सेवेद्वारे श्रद्धेला जिवंत करण्यासाठी आणि दादाजींचा करुणा, एकता आणि मानवतेचा संदेश पुढे नेण्यासाठी सतत कार्यरत आहे.

हा प्राण प्रतिष्ठा महोत्सव भक्ति आणि सेवेचा एक अद्वितीय संगम असेल, जिथे दद्दाजींच्या आदर्शांची ज्योत प्रत्येक हृदयात नवा उत्साह आणि चेतना निर्माण करेल.

# नवीन एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र आयोजित

**नागपूर,७ नोव्हेंबर २०२५:** दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीएमआयएचईआर)चे घटक असलेल्या वानाडोंगरी येथील दत्ता मेघे मेडिकल कॉलेज (डीएमएमसी) येथे नुकतेच नव्याने प्रवेश घेतलेल्या एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी आणि प्राध्यापकांसाठी सायबर सुरक्षा जागरूकता आणि प्रतिबंध या विषयावर माहितीपर सत्र आयोजित करण्यात आले.

दत्ता मेघे मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. उज्वल गजबे यांनी सांगितले की, या सत्राचा उद्देश वाढत्या डिजिटल धोक्यांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक मूलभूत माहिती आणि उपाययोजना विद्यार्थ्यांना समजावून सांगणे हा होता.

या कार्यक्रमाला पोलीस उपआयुक्त आणि सायबर सुरक्षा विषयातील तज्ज्ञ डॉ. अशोक बागुल हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या सायबर गुन्हे तपासातील अनेक वर्षांच्या अनुभवावर आधारित माहितीपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी ओळख चोरी, फिशिंग, सायबर बुलिंग, आर्थिक फसवणूक, डिजिटल अटक, सोशल मीडिया स्कॅम्स आणि डेटा चोरी अशा विविध सायबर गुन्ह्यांबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच, त्यांनी डिजिटल हायजिन राखणे, वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणे आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर करताना सतर्क राहणे याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी डीएमआयएचईआर (डीम्डयुनिव्हर्सिटी) ऑफ–कॅम्पससंचालक डॉ. अनुप मरार यांनी डॉ. अशोक बागुल यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले आणि सायबर कायद्याच्या अंमलबजावणी व जनजागृतीसाठी त्यांच्या अमूल्य योगदानाचे कौतुक केले. आपल्या मनोगतात डॉ. मरार यांनी सांगितले की, आजच्या परस्पर जोडलेल्या डिजिटल जगात जागरूकताच सायबर धोक्यांविरुद्धची सर्वात मजबूत ढाल आहे. विद्यार्थ्यांना डिजिटल जबाबदारीबाबत शिक्षित करणे हे शैक्षणिक शिक्षणाइतकेच महत्त्वाचे आहे.

डॉ. अशोक बागुल यांनी प्रत्यक्ष घडलेल्या सायबर घटनांची उदाहरणे देत गुन्हेगार कसे सिस्टमच्या त्रुटींचा गैरफायदा घेतात हे स्पष्ट केले. त्यांनी मजबूत पासवर्ड वापरणे, दोन–स्तरीय प्रमाणीकरण (टू–फॅक्टरऑथेंटिफिकेशन) सक्षम करणे, संशयास्पद लिंक किंवा डाउनलोड करणे टाळणे आणि सिस्टम नियमितपणे अपडेट ठेवणे अशा प्रत्यक्ष उपयोगी उपाययोजना सांगितल्या. तसेच, भारतातील सायबर गुन्ह्यांशी संबंधित कायदेशीर तरतुदींबाबत सविस्तर माहिती देऊन सायबर गुन्ह्यांची तक्रार कशी करावी आणि पीडितांसाठी कोणत्या आधार सेवा उपलब्ध आहेत हे सहभागींना समजावून सांगितले.

दत्ता मेघे मेडिकल कॉलेजचे वाइस डीन डॉ. ब्रिज राज सिंह यांनी सांगितले की, सत्राची संवादात्मक पद्धत विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणारी ठरली. त्यांनी प्रश्न विचारले आणि स्वतःचे अनुभवही शेअर केले. डॉ. सिंह यांनी पुढे सांगितले की, डॉ. बागुल यांच्या स्पष्ट उत्तरांमुळे आणि उपयुक्त मार्गदर्शनामुळे हे सत्र अत्यंत माहितीपूर्ण आणि अत्यंत प्रेरणादायी ठरले. कार्यक्रमाचा समारोप प्राध्यापक डॉ. शुभदा गाडे यांच्या आभारप्रदर्शनाने झाला, तर प्राध्यापक डॉ. प्रणाली मुळे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन केले. या भेटीचे समन्वय आणि व्यवस्थापन डीबीएएसआयचे प्रशासक डॉ. नुरुल अमीन यांनी केले. या सत्रामुळे सर्व सहभागी अधिक जागरूक आणि सतर्क झाले, ज्यामुळे त्यांना शैक्षणिक आणि वैयक्तिक जीवनात सायबर सुरक्षेचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजले.

# दररोजच्या आहारात कॅलिफोर्नियाच्या बदामांचा मूठभर समावेश करा, रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवा

**मुंबई,७नोव्हेंबर २०२५:**



प्रत्येक वर्षी १४ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक मधुमेह दिन हा मधुमेहाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि सर्वांसाठी सुलभ आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो. यावर्षीचा विषय कार्यस्थळी मधुमेह असा असून, नियोक्ते आणि कर्मचारी या दोघांनीही मधुमेहाविषयी अधिक समजून घेत, कार्यस्थळी प्रभावी व्यवस्थापनासाठी सहकार्यपूर्ण वातावरण निर्माण करण्यावर भर दिला आहे.

आजच्या वेगवान जीवनशैलीत, आहार प्रामुख्याने परिष्कृत कार्बोहायड्रेट्स आणि साखरयुक्त प्रक्रिया केलेल्या पदार्थांवर आधारित असतो, ज्यामुळे मधुमेहाच्या वाढत्या समस्येला चालना मिळत आहे. जगाची मधुमेह राजधानीम्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतासमोर या संदर्भात मोठे आव्हान उभे आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) च्या अलीकडील अभ्यासानुसार, देशात सुमारे १०१ दशलक्ष भारतीयांना मधुमेह आहे, तर आणखी १३६ दशलक्ष लोक प्री-डायबेटिक अवस्थेत आहेत.

संतुलित आहार रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो, आणि दिवसाची सुरुवात पोषक घटकांनी भरलेल्या पदार्थांनी केल्यास आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. बदामांमध्ये प्रथिने, असंतृप्त चरबी आणि आहारातील तंतू यांसह १५ आवश्यक पोषक घटक असतात. दिवसाची सुरुवात बदाम खाऊन केल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित ठेवण्यास मदत होते. संशोधनानुसार, बदामांचे सेवन केल्याने टाइप २ मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये ग्लुकोज नियंत्रण सुधारते आणि कार्बोहायड्रेटयुक्त आहारामुळे वाढणाऱ्या रक्तातील साखरेच्या पातळीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. तसेच, बदामांमध्ये (दाहरोधक) गुणधर्म असून, ते विशेषतः टाइप २ मधुमेह असलेल्या व्यक्तींना फायदेशीर ठरतात.

नवी दिल्लीतील फोर्टिस–सी–डॉक सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर डायबिटीज, मेटाबॉलिक डिसीजेस अँड एंडोक्रायनॉलॉजी चे प्राध्यापक आणि अध्यक्ष डॉ. अनुप मिश्रा यांच्या नेतृत्वाखालील अलीकडील अभ्यासात असे आढळले की जेवणापूर्वी बदामांचे सेवन केल्यास प्री–डायबेटिकआणि लठ्ठपणाने ग्रस्त आशियाई भारतीयांमध्ये रक्तातील साखरेचे नियंत्रण लक्षणीयरीत्या सुधारते. त्यांच्या पोषक घटकांच्या समृद्धतेमुळे आणि वापरातील सुलभतेमुळे, बदाम हे दैनंदिन आहारात सहज समाविष्ट करता येतात आणि एकूण मेटाबॉलिक आरोग्य टिकवून ठेवण्यास मदत करतात.

पोषण आणि आरोग्य सल्लागार शीला कृष्णस्वामी यांनी सांगितले, भारतामध्ये मधुमेह हा सर्वाधिक आढळणाऱ्या असंक्रामक आजारांपैकी एक असून, तो प्रामुख्याने चुकीच्या आहार पद्धती आणि बसून राहण्याच्या जीवनशैलीमुळे वाढत आहे. या जागतिक मधुमेह दिनानिमित्त सर्वांनी जागरूक आहार निवडी करणे आवश्यक आहे.

# आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफतर्फे बीएसई ५०० एनहान्स्ड व्हॅल्यू५० इंडेक्स फंड सादर

**मुंबई,७ नोव्हेंबर २०२५:** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आपल्या युनिट लिंक्ड इन्श्युरन्स प्लॅन्स साठी नवीन फंड आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ बीएसई ५०० एनहान्स्ड व्हॅल्यू५० इंडेक्स फंड सादर केला आहे. या फंडाचा उद्देश ग्राहकांना भारताच्या आर्थिक विकासकथेत सहभागी होण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे आहे. यामध्ये जे मूलतः मजबूत आहेत पण सध्या त्यांच्या खऱ्या क्षमतेपेक्षा कमी मूल्यावर उपलब्ध आहेत अशा शेअर्सवर लक्ष केंद्रित केले जाते.

ग्राहकांसाठी गुंतवणुकीसाठी खुला असलेला हा नवीन फंड बीएसई ५०० एनहान्स्ड व्हॅल्यू५० इंडेक्सचे अनुकरण करेल. यामध्ये ५० कंपन्या समाविष्ट आहेत. या कंपन्या उत्पन्न, बुक व्हॅल्यू आणि किंमतीशी संबंधित विक्री या मूल्याधारित गुंतवणूक निकषांवर निवडल्या जातात. या फंडाचे उद्दिष्ट मूलभूतदृष्ट्या मजबूत परंतु सध्या कमी मूल्यावर उपलब्ध अशा कंपन्यांमधील गुंतवणुकीच्या संधींचा लाभ घेणे आहे. त्यामुळे कालांतराने हे शेअर्स त्यांच्या योग्य मूल्यांकनाकडे जाताना ग्राहकांना लाभ मिळू शकतो.

हा इंडेक्स फंड एक प्रणालीबद्ध, नियमाधारित गुंतवणूक प्रक्रिया अवलंबतो आणि मोठ्या, मध्यम आणि लहान कॅप सेगमेंट मध्ये बदलत्या मूल्यसंधीशी सुसंगत राहण्यासाठी त्रैमासिक पुनर्रचना केली जाते. यामुळे ग्राहकांना कमी परिश्रमात आणि कमी ट्रॅकिंग एररसह वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ मिळतो. परिणामी, एक संभाव्य ट्रॅकिंग एरर उद्भवू शकते. ऐतिहासिकदृष्ट्या, बीएसई ५०० एनहान्स्ड व्हॅल्यू५० इंडेक्सने २००६ ते २०२४ या कालावधीत १९ पैकी १२ वर्षांमध्ये आपल्या मूळ इंडेक्सपेक्षा अधिक चांगली कामगिरी दर्शवली आहे. त्यातून शिस्तबद्ध मूल्य-गुंतवणूक धोरणाची दीर्घकालीन क्षमता अधोरेखित होते. या सादरीकरणाबद्दल भाष्य करताना आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे मुख्य गुंतवणूक अधिकारी श्री. मनीष कुमार म्हणाले, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ बीएसई ५०० एनहान्स्ड व्हॅल्यू५० इंडेक्स फंड हा एक पॅसिव्हली व्यवस्थापित फंड असून आमच्या युलीप ग्राहकांना भारताच्या विकासकथेत सहभागी होण्यासाठी एक साधा आणि पारदर्शक मार्ग देईल. हा फंड त्यांना दीर्घकालीन मूल्य-गुंतवणुकीच्या सिद्ध तत्त्वज्ञानाद्वारे संपत्ती निर्माण करण्याची संधी प्रदान करेल.ग्राहक आपली बचत जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आमच्यावर विश्वासाने सोपवतात आणि एक ग्राहक–केंद्रितब्रँड म्हणून त्यांच्या दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता सुनिश्चित करू शकतील अशा गुंतवणूक पर्यायांची सुविधा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

# आयसीआयसीआय प्रु लाइफने ग्राहकांना जीएसटीचा फायदा दिला, ज्यामुळे विमा स्वस्त झाला

**अमरावती, ०७ नोव्हेंबर:** कोणत्याही व्यक्तीच्या आर्थिक नियोजनाचा मुदत विमा हा एक आवश्यक भाग आहे. जर घरातील कमावत्या सदस्याचे निधन झाले तर कुटुंबासाठी उत्पन्नाचे साधन म्हणून याचा उपयोग होऊ शकतो. या मजबूत पायाच्या आधारे आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याची खात्री होते.

सर्व विमा पॉलिसींना जीएसटीमधून वगळण्यासाठी भारत सरकारने अलीकडेच सुधारणा आणल्या. पूर्वी ग्राहक जीएसटीपोटी प्रीमियम रकमेच्या १८% भरत असत, उदाहरणार्थ, जर एखाद्या व्यक्तीला १०० रुपयांचा प्रीमियम भरावा लागत असेल तर त्यापेक्षा १८ रुपये जास्त जीएसटी म्हणून आकारले जात होते. मात्र, आता जीएसटी सूट मिळाल्याने त्या व्यक्तीला फक्त १०० रुपये द्यावे लागतील. यामुळे जीवन विमा उत्पादने स्वस्त झाली आहेत, यात मुदत विमा उत्पादनांचा देखील समावेश आहे.

ग्राहकांना सर्वोत्तम मूल्य देण्याच्या वचनबद्धतेनुसार आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने त्यांच्या ग्राहकांना संपूर्ण जीएसटी सूट लाभ दिला आहे. अशा प्रकारे, प्रत्येक भारतीय कुटुंबासाठी विमा योजना अधिक परवडणाऱ्या आणि सुलभ बनविल्या जात आहेत.

टर्म इन्शुरन्स उत्पादनांच्या किंमतीवर याचा काय परिणाम झाला आहे ते पाहूया. पूर्वी, ३० वर्षांचा धूम्रपान न करणारा पुरुष, जीएसटीसह ८२५ रुपये मासिक प्रीमियम भरत असे. आता त्याच व्यक्तीला ३० वर्षांच्या कालावधीसाठी १ कोटी रुपयांच्या जीवन विमा कव्हरसाठी फक्त ६९९ रुपये द्यावे लागतील. शिवाय, तेच कव्हर आणि त्याच कालावधीसाठी धूम्रपान न करणाऱ्या ३० वर्षांच्या महिलेला आता जीएसटीसह ६९७ रुपयांऐवजी फक्त ५९४ रुपये मासिक प्रीमियम भरावा लागेल.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे मुख्य उत्पादन अधिकारी श्री. विकास गुप्ता म्हणाले, आमच्या ग्राहकांसाठी जे योग्य आहे ते करणेच महत्त्वाचे आहे, यावर आमचा विश्वास आहे. आम्ही आमच्या ग्राहकांना जी परतफेड करतो त्या प्रत्येकातून विश्वास मजबूत होतो, परवडणारी क्षमता वाढते आणि आम्हाला अशा भविष्याच्या जवळ नेते जिथे विमा प्रत्येकाच्या आवाक्यात असेल. अधिकाधिक व्यक्तींना त्यांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्यास प्रोत्साहित करून भविष्य सुरक्षित करण्यासाठी कंपनीच्या सध्या सुरू असलेल्या प्रयत्नांना ते पूरक आहे.

महत्त्वाचे म्हणजे, टर्म इन्शुरन्स हा एक आर्थिक सुरक्षा उपाय आहे जो एखाद्या व्यक्तीच्या प्रियजनांची त्याच्या अनुपस्थितीतही काळजी घेतो. म्हणूनच, संरक्षण उत्पादने सर्वांच्या आवाक्यात असणे महत्त्वाचे असते. आता कमी केलेल्या प्रीमियममुळे विम्याचा विस्तार वाढेल आणि लाखो भारतीयांच्या जीवनात आर्थिक संरक्षण आणण्याच्या उद्देशाला पाठबळ मिळेल.

## अदाणी एंटरप्रायझेसच्या कच्छ कॉपर आणि कॅराव्हेल मिनरल्सने केला धोरणात्मक सामंजस्य करार

**अहमदाबाद आणि पर्थ, ०७ नोव्हेंबर २०२५:** कॅराव्हेल मिनरल्स लिमिटेड ने कच्छ कॉपर लिमिटेड (केसीएल) जी अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेडची उपकंपनी आहे हिच्याशी एक ऐतिहासिक, बंधनमुक्त सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.या कराराचा उद्देश पश्चिम ऑस्ट्रेलियातील मर्चिसन प्रदेशातील कॅराव्हेल कॉपर प्रकल्पावर धोरणात्मक सहकार्य स्थापन करणे हा आहे.

या एमओयू अंतर्गत दोन्ही कंपन्या गुंतवणूक आणि ऑफटेक संधींचा शोध घेतील, जेणेकरून प्रकल्पाच्या विकासाला गती देऊन २०२६ मध्ये अंतिम गुंतवणूक निर्णय घेता येईल. यामध्ये कॅराव्हेलच्या जागतिक दर्जाच्या संसाधनांना अदाणी समूहाच्या स्मेल्टिंग,प्रोसेसिंग आणि लॉजिस्टिक्समधील कौशल्याशी जोडले जाणार आहे.

या भागीदारीअंतर्गत दोन्ही कंपन्यांनी एक एक्सक्लुझिव्ह फ्रेमवर्क स्थापन केला आहे, ज्यामध्ये प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीसाठी कॉपर कॉन्सन्ट्रेटच्या१०० टक्क्यांपर्यंतच्या ऑफटेक करारासाठी वाटाघाटी करण्यात येतील.या प्रकल्पातून सुरुवातीच्या वर्षांत दरवर्षी अंदाजे ६२,००० ते ७१,००० टन पेयेबल कॉपर उत्पादन अपेक्षित आहे. हे कॉन्सन्ट्रेट थेट कच्छ कॉपर स्मेल्टरला पुरवले जाईल.ही १.२ अब्ज अमेरिकन डॉलर (१.८ अब्ज ऑस्ट्रेलियन डॉलर) गुंतवणुकीची अत्याधुनिक सुविधा गुजरात,भारत येथे उभारली जात आहे, जी जगातील सर्वात मोठी एकाच ठिकाणी असलेली कॉपर सुविधा ठरणार आहे.

कॉपर हे जागतिक ऊर्जा संक्रमणाचे कणा आहे,आणि कॅराव्हेल मिनरल्सबरोबरची आमची भागीदारी भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या भूमिकेला बळकट करते,ज्यायोगे या अत्यावश्यक धातूसाठी लवचिक आणि जबाबदार पुरवठा साखळी निर्माण करता येईल, असे डॉ.विनय प्रकाश,सीईओ नॅचरल रिसोर्सेस,अदाणी यांनी सांगितले.

**शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५**

| कल्याण बाजार (पत्थर फोड एकच) | मुंबई बाजार (पत्थर फोड एकच) |
|---|---|
| २ ३ ६ ९ | २ ५ ६ ७ |
| १५६ १२० ११४ १८९ | ४९९ ६१० १७८ ७०० |
| २०० ३०० २७७ ३७९ | १३८ ७८० २६८ १६० |
| ३४५ ४९० ३३० २७० | ३१० ४५६ ३६७ २५० |
| जोडी | जोडी |
| २४ - २९ - ६८ - ९८ | २१ - ५१ - ६८ - ७८ |
| २५ - २७ - ६७ - ९७ | २४ - ५४ - ६९ - ७९ |
| २२ - २६ - ६६ - ९९ | २० - ५० - ६२ - ७२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ८ नोव्हेंबर २०२५

**शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५**

**सर्व बाजार साठी**

१२ - ४२ - ७३ - ८३
१६ - ४६ - ७५ - ८५
१० - ४० - ७९ - ८९

२३६ - २५७ - २६९ - १७०
४८९ - १४९ - ४५८ - २७९
५६० - ३४७ - १८८ - ४६८

सर्व बाजारासाठी

गुरू. ते शनि. ओपन डे / गुरू. ते शनि. ओपन नाईट

६८० १७९ ३८० १४५ १२६ २६९
५९० **४** २७८ **७** ४७० **१** ३८१ **०** २८१ **९** ४५८ **७**
७७० ३७७ ५६० ५७८ ५६८ ३५९

गुरू. ते शनि. क्लोज डे / गुरू. ते शनि. क्लोज नाईट

१५७ ४४८ २७० ६७० १३४ १८०
४९० **३** २५१ **६** ४६१ **९** ३५० **३** ४८० **८** ३७१ **९**
५८० १७८ ३६० ५६७ ५७० ४५०

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

३ ५ ६ ७ ४

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

## राशीभविष्य

**मेष :** आज कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवल्याने तुमचा आनंद वाढेल. तुमच्या जोडीदाराच्या पाठिंब्याने महत्त्वाची कामे पूर्ण करता येतील. तुमची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा मजबूत होईल.

**वृषभ :** आज तुमचा आत्मविश्वास उंचावेल, पण याचा फायदा घेऊ नका. कोणाशीही वाद घालू नका. धार्मिक कार्यात तुमची आवड वाढेल. आज तुमचा खर्च वाढेल, जास्त खर्च होऊ देऊ नका, बचतीकडे लक्ष द्या.

**मिथुन :** आज, घरी नातेवाईत येतील, भेटी होतील, आनंद वाढेल. तुमची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. प्रभावशाली लोकांशी तुमची ओळख वाढेल, जी फायदेशीर ठरू शकते.

**कर्क :** आजचा दिवस समाधानकार जाईल. तुमच्या मनात एखादी योजना असेल तर त्यावर आजच कृती करा आणि ते काम पूर्ण करा. आज तुम्हाला मित्रांकडून पाठिंबा मिळू शकतो.

**सिंह :** आज एखाद्या शुभ कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. कारकिर्दीत सकारात्मक बदल घडवून आणण्याची संधी तुम्हाला मिळेल. समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल. आजचा दिवस धावपळीचा असेल.

**कन्या :** आज व्यवसायातील बारकावे समजून घेणे महत्वाचे आहे. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेणे उचित आहे. स्पर्धेर्चा तुमच्या कामावर नकारात्मक परिणाम होईल. धैर्याने काम करा आणि समस्या सोडवा.

**तुळ :** जर तुम्ही घराच्या देखभालीचे किंवा नूतनीकरणाचे काम करत असाल तर दिवस योग्य आहे. आज तुम्ही काही कामासाठी नवीन योजना देखील विचारात घेऊ शकता.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी थोडासा कठीण असेल. व्यवसायातील समस्या सोडवण्यासाठी तुम्हाला एखाद्या खास व्यक्तीकडून मदत मिळू शकते. आज तुम्हाला सक्रिय राहण्याची आवश्यकता आहे.


**धनु :** आज, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांच्या मार्गदर्शनाने, नात्यांमधील कोणतेही गैरसमज दूर होतील. ही वेळ तुमच्या वर्तनात सुधारणा करण्याची आणि भूतकाळातील चुका सुधारण्याची आहे.

**मकर :** विद्यार्थ्यांना अभ्यासात अनुकूल निकाल मिळतील. शुभ कार्यक्रमांचे नियोजन केले जाईल. कुठेतरी अडकलेले पैसे आज तुम्हाला परत मिळू शकतात. प्रेमातील जोडप्यांसाठी छान जाईल दिवस.

**कुंभ :** आजचा दिवस चढ–उतारांचाअसेल, तुम्ही तुमचं लक्ष, तुमची ऊर्जा तुमच्या कामावर केंद्रित करा. तथापि, तुमच्या कठोर परिश्रमामुळे कोणत्याही समस्या सुटतील.

**मीन :** आज, एखाद्या नवीन स्रोताकडून अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. सर्वत्र आनंदाचे वातावरण असेल. तुम्हाला काही मनोरंजक माहिती शिकायला मिळेल. आधी महत्त्वाची कामे पूर्ण करा.

## शब्दकोडे क्रमांक २२६१




**आडवे शब्द :-**
१) नूतन
४) गेरू
६) दक्षतेचा इशारा
९) नशा आणणारा एक पदार्थ
१०) केसांची जाड बट
११) वर्तन
१३) पक्षांचा राजा
१४) पाय
१५) मृत्युदेवता
१६) उपयोग
१७) जुगर
१८) पुरुष
२१) नशा आणणारा एक पदार्थ
२२) भेग वाढविणारी खुंटी
२४) सैनिक
२५) माळ, हार
२६) धनी
२८) क्रिकेटमधील धाव
२९) जीवात जीव असे पर्यंत
३०) मनाला टोचणारे दुःख
३१) कामदेव
३२) संस्कृत भाषा
३३) आईचा भाऊ
३४) कावळा
३६) फळीवरुन खाली घसरत येण्याचा खेळ
३८) धैर्य
३९) मृदा
४०) श्रेष्ठपुरुष
४३) रतन(हिं.)
४५) कमळ
४७) कलाबूत
४८) नाश
५१) कापड, वस्त्र
५३) जैन साधू
५५) मंदिर
५७) वंदनीय
५८) केसांची लट
५९) मस्ती, गर्व
६०) पदर
६२) प्रचंड, फार मोठा
६३) स्वाक्षरी
६४) कसब, पटुत्व
६५) कणा
६७) गाठी, शेव, चिवडा इ.चे मिश्रण
६९) पादत्राण
७०) दुष्ट
७२) अदपाव
७४) घाबरणे
७५) गंध
७६) अंगमेहनत

**उभे शब्द :-**
१) दृष्टीची टक्कर
२) रस्ता, मार्ग
३) गाजावाजा
४) धोतराचा किंवा लुगड्याचा मागे खोचलेला भाग
५) वर्तुळ
६) टरफल
७) अरण्यवास
८) हवालदार
९) अडथळा, विरोध
१२) रुचकर, खमंग
१९) पाठवणी
२०) युद्धातील एक घोषणा
२३) छोटी लढाई
२५) च्या बरोबर
२६) सामान
२७) दुर्दशा
२९) गवताची झोपडी
३०) संतोष, तृप्ती
३४) बैलाच्या गळ्यात बांधण्याची रस्सी
३५) दुबळा, गरीब
३७) कोवळा अंकुर
३९) मावशीची मुलगी
४१) मोजकेपणा, मितता
४२) एक कालवण
४४) पुत्र, मुलगा
४६) प्राण
४९) जाडसर पीठ
५०) आकाराने छोटा पण आवाजाला मोठा असा फटाका
५२) नट
५३) माफी मागणे
५४) अलमारी
५६) मीठ
६१) त्वरित
६३) एक पांढरा शुभ्र प्राणी
६४) एक पालेभाजी
६५) नंतर
६६) लोखंड गुलगुळीत करण्याचे हत्यार
७१) गमन करणे
७३) रागावलेला

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**





# बालांगण

## मधूर सनई

वाद्यांची ओळख

सनई म्हणजेच शहनाईहे भारतीय शास्त्रीय आणि लोकसंगीतामधील एक अतिशय महत्त्वाचे वाद्य आहे. हे वायुवाद्य या प्रकारात मोडते. सनईचे सूर मधुर आणि शुभ असतात. त्यामुळे लग्न, मंगलकार्य, धार्मिक विधी यामध्ये सनई पारंपरिकरित्या वापरली जाते. सनई मुघल दरबारात विकसित झाली असे म्हटले जाते. 'शाह' आणि 'नाई' म्हणजे संगीतकार या शब्दांपासून शहनाई आणि त्यापासून पुढे 'सनई' हा शब्द तयार झाला. प्राचीन काळी ती केवळ दरबारात आणि मंदिरात वाजवली जात होती. नंतर ती लोकसंगीताचा महत्त्वाचा भाग बनली.

सनई साधारणतः लाकडापासून तयार केली जाते. तिचा देह शंकूसारखा असतो. एका टोकाला रीड बसवलेली असते. त्यातून फुंकर मारली जाते. दुसऱ्या टोकाला धातूची किंवा लाकडाची फुगीर बेल असते. सनईला साधारण ६ ते ९ छिद्रे असतात.त्यामुळे विविध स्वर निर्माण होतात.

सनई वाजवण्यासाठी कलाकाराला श्वास आणि ओठांचा ताण योग्य प्रमाणात नियंत्रित करावा लागतो. छिद्रांवरील बोटांची पकड बदलून विविध सूर काढले जातात. सनई वाजवण्यासाठी श्वास घेण्याची तंत्रशुद्ध पद्धत वापरली जाते. त्यामुळे सनई वाजवणे मोठे कौशल्य मानले जाते.चित्रपटसंगीतातही सनईला विशेष स्थान मिळाले आहे. वसंत देसाई आणि नौशाद यांच्यासारख्या संगीतकारांनी सनईचा भावपूर्ण वापर केला. भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान हे आजवरचे सर्वश्रेष्ठ सनईवादक आहेत. त्यांनी सनईला केवळ लोकवाद्य न ठेवता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले. सनईचे सूर भारतीय परंपरेचा अविभाज्य भाग आहेत.





## सफर ज्योतिर्लिंगांची

नॉलेज

मित्रमैत्रिणींनो, शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांबद्दल तुम्ही ऐकलं असेल. ही ज्योतिर्लिंगं भारतात आहेत. महाराष्ट्रात तीन ज्योतिर्लिंगं आहेत. चला तर, या ज्योतिर्लिंगांची सैर करू या.

- गुजरातमधल्या सौराष्ट्रमध्ये सोमनाथ मंदिर आहे. हे जगातलं पहिलं ज्योतिर्लिंग असल्याचं म्हटलं जातं. सोमनाथचं बरंच महत्त्व आहे. समुद्रकिनारी वसलेल्या सोमनाथाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात.
- मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग आंध्र प्रदेशमधल्या श्रीशैल पर्वतावर आहे. या स्थानाला कैलास पर्वताइतकं महत्त्व आहे. हे मंदिर कृष्णा नदीच्या काठावर वसलं आहे.
- केदारनाथ ज्योतिर्लिंगही खूप प्रसिद्ध आहे. उंच पर्वतावर वसलेल्या केदारनाथाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी झालेली असते. थंडीत या भागात बर्फ पडतो. म्हणून हे मंदिर बंद ठेवण्यात येतं. बर्फ वितळू लागल्यावर केदारनाथ भाविकांसाठी खुलं होतं.
- पुण्याजवळ भीमाशंकर ज्योतिर्लिंग आहे. सह्याद्री पर्वतावर भीमाशंकराचं मंदिर आहे. हे मंदिरही खूप सुंदर आहे.
- मध्य प्रदेशमध्ये इंदूरजवळ ओंकारेश्वर मंदिर आहे. या ज्योतिर्लिंगाचा आकार ओमसारखा वाटत असल्यामुळे ओंकारेश्वर हे नाव पडलं.
- उज्जैनमध्ये महाकालेश्वर ज्योतिर्लिंग आहे. या ज्योतिर्लिंगाचं तोंड दक्षिणेकडे आहे आणि हेच याचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. या मंदिरात पहाटे भस्मारती होते. ही भस्मारती खूप प्रसिद्ध आहे.
- बनारसमध्ये विश्वेश्वराचं मंदिर आहे. हे मंदिर काशी विश्वेश्वर या नावाने ओळखलं जातं. गंगा नदीच्या किनारी वसलेलं हे मंदिर भक्तांच्या आकर्षणाचं केंद्र आहे.
- नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग आहे. गोदावरी नदीच्या किनारी असणारं हे मंदिर आणि आसपासचा परिसर खूपच सुंदर आहे. या मंदिराजवळ ब्रह्मगिरी नावाचा पर्वत आहे. इथूनच गोदावरी नदीचा उगम होतो.
- वैद्यनाथ ज्योतिर्लिंग झारखंडमध्ये आहे. हे स्थान वैद्यनाथ धाम या नावाने ओळखलं जातं.
- गुजरातमध्ये नागेश्वर ज्योतिर्लिंग आहे. नागेश्वर म्हणजे नागांची देवता. भगवान शंकर ही नागांची देवता असल्यामुळे नागेश्वर असंही म्हटलं जातं.
- तमिळनाडूमधल्या रामनाथपुरममध्ये रामेश्वरम ज्योतिर्लिंग आहे. हे स्थान हिंदू धर्मातल्या अत्यंत पवित्र अशा चार धामांपैकी एक आहे. या ज्योतिर्लिंगाची स्थापना श्रीरामाने केल्याचं म्हटलं जातं. म्हणून हे स्थान रामेश्वरम या नावाने ओळखलं जातं.
- महाराष्ट्रात औरंगाबादजवळ घृष्णेश्वर महादेव मंदिर आहे. या स्थानाला घुश्मेश्वर असंही म्हटलं जातं. इथेही भाविकांची मोठी गर्दी झालेली असते.



## देशोदेशीच्या गुप्तचर संस्था

महत्त्वाचं काही...





प्रत्येक देशाचे गुप्तचर विभाग असतात. छत्रपती शिवाजी महाराजांचंही गुप्तचर खातं होतं. बहिर्जी नाईक या खात्याचे प्रमुख होते. शत्रुच्या गोटातल्या हालचालींची माहिती महाराजांपर्यंत पोहोचवण्याचं काम बहिर्जी नाईक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलं. भारताची 'रॉ' ही गुप्तचर संस्था आहे. देशोदेशीच्या गुप्तचर संस्थांविषयी...

- 'रिसर्च अँड ॲनॅलिसिस विंग' म्हणजे 'रॉ' ही भारताची गुप्तचर संस्था. या संस्थेची स्थापना १९६८ मध्ये झाली. या संस्थेचं मुख्य कार्यालय नवी दिल्लीत आहे. इंटेलिजन्स ब्युरो म्हणजे आयबी ही संस्थाही देशाच्या सुरक्षेसाठी काम करते. या दोन्ही संघटना देशावरचं संकट रोखण्यासाठी प्रयत्नशील असतात.
- फेडरल सिक्युरिटी सर्व्हिस ही रशियाची गुप्तचर संस्था आहे. या संस्थेची स्थापना २० एप्रिल १९९५ रोजी झाली.
- मिनिस्ट्री ऑफ स्टेट सेक्युरिटी ही चीनची गुप्तचर संस्था. या संस्थेची स्थापना १९८३ मध्ये झाली.
- सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी म्हणजे सीआयए ही अमेरिकेची गुप्तचर संस्था आहे. या संस्थेतले अधिकारी सतत कार्यरत असतात. १९४७ मध्ये या संस्थेची स्थापना करण्यात आली. विविध प्रकारचे गुन्हे, दशहतवाद रोखण्याच्या दृष्टीने सीआयए काम करते.
- डीजीएसई ही फ्रान्सची गुप्तचर संस्था आहे. ही संस्था इतर देशांच्या गुप्तचर संस्थापेक्षा वेगळी आहे. सरकारला संभाव्य दहशतवादी हल्ल्यांबाबत माहिती देणं हे या संस्थेचं मुख्य काम आहे. १९८२ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेत पाच हजार कर्मचारी आहेत.

## हॅलोविनचा खोडकर पुका

आयरीश लोककथा

आयर्लंडमध्ये फार पूर्वी पुका राहत होता. पुका म्हणजे कुणी माणूस नव्हता. तो होता एक खोडकर आत्मा. तो हवे ते रूप घेऊ शके. तो कधी काळा घोडा बनत असे,कधी ससा तर कधी चकचकीत पंख असलेला कावळा. पण कितीही रूपे बदलली तरी त्याच्या डोळ्यातली खोडकर चमक मात्र कायम असे.

हॅलोविनच्या रात्री गावात कोणी उशिरा बाहेर फिरायला गेले की झालेच. पुका त्या माणसाच्या मागे जाऊन अचानक भुर्रकन आवाज करत त्याच्या अंगावर उडी मारत असे. कधी तो झाडांची पाने गदागदा हलवत असे तर कधी लोकांच्या अंगावर दगड टाकून त्यांना घाबरवीत असे. लोक घाबरून पळू लागले की पुका मागून हसत खिदळत त्यांची चेष्टा करी. 'अरे एवढेच केले तर घाबरलास? अजून तर मी मोठी खोडी काढणार आहे!'

पण पुका वाईट मात्र नव्हता. कधी कधी तो लोकांना मदतही करत असे. एखाद्या शेतकऱ्याचे धान्य वाऱ्याने उडू लागले तर पुका हळूच ते रचून ठेवी. दुसऱ्या दिवशी शेतकरी उठला की त्याला शेताच्या एका कोपऱ्यालत सगळ्या धान्याचा भला मोठा डोंगर दिसे. तो थक्क होऊन म्हणे, 'हे कसे झाले? कुणी केले?' तेव्हा पुका एकदम समोर उभा राहत असे. 'अरे मी केले. मी आहे पुका. मला धन्यवाद तरी म्हण रे!'

थोडेसे दूध किंवा गोड पदार्थ दिला की पुका खूश होई. मग तो त्या दिवशी त्या माणसाची खोडी काढत नसे. त्यामुळे आजही हॅलोविनच्या रात्री काही गावात लोक पुकासाठी गोडधोड बाहेर ठेवतात आणि हळूच म्हणतात,'गुड नाईट पुका. फक्त माझ्यामागे येऊन मला घोडा बनवू नकोस!'



## राजकारणात रस आहे?

कोण होणार?



मुलांनो, तुम्हाला राजकारणात रस आहे का? राजकीय घडामोडींवर तुमचं लक्ष असतं का? तसं असल्यास तुम्ही राजकीय नेतृत्त्वाच्या क्षेत्रात करिअर करू शकता. विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करणाऱ्या भारतासारख्या देशाला राजकीय क्षेत्रातल्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी हुशार, सक्षम आणि जाणकार तरुणांची आवश्यकता आहे. पब्लिक लीडरशीप अभ्यासक्रमांची निवड करून तुम्ही या क्षेत्रात पुढे जाऊ शकता.

पब्लिक लीडरशीपच्या क्षेत्रात आज अनेक संधी उपलब्ध आहेत. मात्र भारतात या विषयावरचे मर्यादित अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. पुण्यात एमआयटी स्कूल ऑफ मॅनेजमेंटमध्ये पब्लिक लीडरशीप अँड गव्हर्नमेंट या विषयाचा दोन वर्षांचा मास्टर्स अभ्यासक्रम आहे. नवी दिल्लीतल्या इन्स्टीट्यूट ऑफ पॉलिटिकल लीडरशीपमध्ये इलेक्शन मॅनेजमेंट, स्पोक्सपर्सन, कॅम्पेन मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तुम्ही आपल्या आवडीनुसार आणि कौशल्यांनुसार अभ्यासक्रमांची निवड करू शकता.

या क्षेत्रात करिअर करण्यासाठी नेतृत्वकौशल्य, संवादकौशल्य, आत्मविश्वास, नव्या गोष्टी शिकण्याची आवड या गुणांची आवश्यकता असते. हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्ही राजकीय क्षेत्रात महत्त्वाची पदं भूषवू शकता.

## बर्फ का पडतो?

जाणून घ्या



मुलांनो, थंडीत बऱ्याच ठिकाणी बर्फ पडत असल्याचं तुम्ही बघितलं असेल. हिमाचल प्रदेश, काश्मीर अशा ठिकाणी बर्फ पडतो. इथे तुम्ही फिरायलाही गेला असाल. आता आकाशात हा पांढराशुभ्र बर्फ कसा तयार होतो आणि तो पृथ्वीवर कसा पडतो हे जाणून घेऊ.

सूर्याच्या उष्णतेमुळे नदी, तलाव, समुद्राच्या पाण्याचं बाष्पीभवन होतं. या पाण्याचं रुपांतर वाफेत होतं. हवेपेक्षा हलकी असणारी वाफ तरंगत आकाशाच्या दिशेने जाऊ लागते. या वाफेचं रुपांतर ढगांमध्ये होतं. या ढगांमधून पाऊस पडतो. पण काही वेळा हे ढग वातावरणात अधिक वर जातात. या भागातलं तापमान खूप कमी असतं. या कमी तापमानामुळे ढगांमधलं पाणी गोठतं. त्याचं रुपांतर बर्फाच्या छोट्या कणांमध्ये होतं. या कणांचं वजन हवेपेक्षा जास्त असतं. हवेला वजन न पेलवल्यामुळे बर्फाचे कण खाली पृथ्वीवर येतात. यालाच बर्फवृष्टी किंवा बर्फ पडणं असं म्हटलं जातं. बर्फ पडू लागल्यावर सगळीकडे बर्फाची पांढरी चादर पसरते. हे दृश्य खूप छान दिसतं. तुमच्यापैकी काहींनी याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असेल. बऱ्याचजणांनी हे दृश्य टीव्हीवरही बघितलं असेल.

काही ठिकाणी भरपूर बर्फ पडतो. मग इथले लोक इग्लू तयार करतात. इग्लू हे एस्कीमो प्रजातीच्या लोकांचं घर असतं. इग्लू बर्फापासून तयार केलं जातं. बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांना आर्क्टिक हिस्टिरिया नावाचा आजार होण्याची शक्यता असते. उत्तर ध्रुवावर राहणाऱ्या लोकांना हा आजार होतो. त्यामुळे बर्फ कितीही छान वाटला तरी फार काळ त्याची मजा लुटता येत नाही.

## नर्मदा

जीवनदायिनी नदी

नर्मदा भारतातील एक महत्त्वाची व पवित्र नदी आहे. तिचा उगम मध्यप्रदेश राज्यातील अमरकंटक पर्वतरांगामध्ये होतो. नर्मदा नदीची लांबी साधारणपणे १३१२ किलोमीटर आहे. भारतातील बहुतेक नद्या पूर्वेकडे बंगालच्या उपसागराला मिळतात.पण नर्मदा मात्र पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत जाते आणि शेवटी अरबी समुद्राला मिळते.

नर्मदा नदी मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांतून वाहते.तिच्या काठावर मोठी शहरे आणि गावे वसलेली आहेत. शेती, पाणीपुरवठा आणि वीज निर्मिती यासाठी नर्मदा नदीच्या पाण्याचा वापर केला जातो.हिंदू धर्मात नर्मदा नदीला देवी मानले जाते. अनेक लोक नर्मदापरिकं मा व'त करतात. या परिकं मेत नदीच्या काठाने चालत तिची पूर्ण प्रदक्षिणा केली जाते. महेश्वर, ओंकारेश्वर, होशंगाबाद यांसारखी अनेक पवित्र ठिकाणे नर्मदा नदीच्या किनारी आहेत.

नर्मदा नदीच्या पाण्यावर अनेक मोठे प्रकल्प उभारले गेले आहेत. त्यापैकी 'सरदार सरोवर धरण' हा सर्वांत प्रसिद्ध प्रकल्प आहे. नर्मदा नदीच्या दऱ्या, निसर्गसंपदा आणि सौंदर्यामुळे ती पर्यटनासाठीही ओळखली जाते. मार्बल रॉक म्हणून प्रसिद्ध असलेल्या भेडाघाट या ठिकाणीनर्मदा नदी संगमरवरी कड्यांच्या मधून वाहते. सूर्यप्रकाशात हे चमकते दृश्य खूप मोहक दिसते. इथे बोटिंगचीही सोय आहे आणि हजारो पर्यटक दरवर्षी हे ठिकाण पाहायला येतात.

गहू, कापूस, डाळी, फळे आणि भाज्या यांची शेती नर्मदा नदीच्या काठावर फुलली आहे. कारखान्यांमुळे आणि चुकीच्या वापरामुळे होणारे प्रदूषण, जंगलतोड यामुळे नदीच्या प्रवाहावर परिणाम होतो आहे. सरकार आणि समाज या दोघांनी मिळून नर्मदा स्वच्छ ठेवली तरच तिचे जीवनदायी महत्त्व टिकून राहील.

### ठिपके जुळवा



### दोस्त हे मस्त

## काटेदार साळींदर



दोस्तांनो, साळींदर नावाचा एक प्राणी आहे. साळींदरच्या शरीरावर टोकदार काटे असतात. हा प्राणी या काट्यांनी शत्रूवर हल्ला चढवतो. साळींदर फार बाहेर पडत नाही. त्याला बिळात लपून रहायला आवडतं. तो अन्न शोधण्यासाठी बिळाबाहेर पडतो. त्याला अंधार जास्त आवडतो. साळींदर झाडावर चढू शकतो. साळीच्या शरीराच्या मागच्या भागात भरपूर काटे असतात. उर्वरित शरीरावरचे केस मात्र मऊ असतात. या काट्यांची संख्या जवळपास ३० हजारांच्या घरात असते. काही काळानंतर जुने काटे पडून जातात आणि त्या जागी नवे काटे येतात. साळींदर पाच ते सात वर्षं जगातात.

### खादाडी

## पौष्टिक नूडल्स सॅलड



मुलामुलींनो, तुम्हाला नूडल्स तर आवडतच असतील. तुम्ही नूडल्स सॅलड ही रेसिपी बनवू शकता. यासाठी एक कप उकडलेले नूडल्स, ब्रोकोली, गाजर, सिमला मिरची, टोमॅटो, कोबी, कांदा आणि कांद्याची पात अशा भाज्या बारीक चिरून घ्या. एक चमचा ऑलिव्ह ऑईल, दोन हिरव्या मिरच्या, पाव चमचा हळद, चार ते पाच काजू, मीठ, मिरपूड, बारीक चिरलेली कोथिंबिर हे साहित्य घ्या. एका कढईत ऑलिव्ह ऑईल घालून थोडं गरम करा. त्यात हळद घाला. मग सगळ्या भाज्या घालून दोन मिनिटं परता. त्यात मीठ आणि मिरपूड घालून हलवून घ्या. मग उकडलेले नूडल्स, काजूचे तुकडे आणि कोथिंबिर घाला. एक मिनिट शिजवून घ्या. तुमचं नूडल सॅलड तयार आहे. हे सॅलड सॉस घालून खाता येईल.

### स्टडी टिप्स

## आनंदी राहा!



परीक्षा आल्यावर तुम्हाला खूप ताण येतो. तुम्ही घाबरून जाता. पण परीक्षेचा ताण घेण्यापेक्षा या दिवसात आनंदी रहा. परीक्षेत चांगले गुण मिळवणं गरजेचं आहे. पण फक्त पाठांतर करण्यापेक्षा विषय नीट समजून घ्या. तुम्हाला ज्ञान मिळायला हवं. विषयाचा पाया बळकट असेल तर तुम्हाला परीक्षेत कोणतीही अडचण येणार नाही. इतरांशी नाही तर स्वतःशी स्पर्धा करा. स्वतःचं ज्ञान वाढवण्यासाठी भरपूर वाचा. स्वतःच्या अभ्यासाचं नीट नियोजन करा. शेवटच्या टप्प्यात सराव आणि उजळणीवर भर द्या.

### योगा टाईम

## तुम्हाला राग येतो का?



छोट्यांनो, तुम्हाला राग येतो का, तुम्ही सारखी चिडचिड करता का... मग तुम्ही काही योगासनं करायला हवीत. रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी उनमामी मुद्रा करता येईल. ही मुद्रा करण्यासाठी पद्मासनात किंवा मांडी घालून बसा. डोळे मिटून आपलं सगळं लक्ष भुवयांच्या मध्यभागी केंद्रित करा. हे आसन करताना मनात कोणतेही विचार येऊ देऊ नका. यामुळे तुमची एकाग्रताही वाढू शकेल. ताण कमी झाल्यामुळे चिडचिड कमी होईल. परीक्षेच्या काळात हे आसन केल्यामुळे बरेच लाभ मिळू शकतील.

### १४६८ कोटींच्या खर्चातून उभारणार वैद्यकीय, शैक्षणिक संकुल

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज भूमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावरील गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम सिरोंचा तालुक्यात आता विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि राणा शिपिंग कंपनीचे संचालक राणा सूर्यवंशी यांच्या पुढाकारातून सिरोंचा-अंकीसा राष्ट्रीय महामार्गावरील राजेश्वरपल्ली येथे तब्बल १४६८ गुंतवणूक कोटींच्या गुंतवणुकीतून भव्य वैद्यकीय आणि शैक्षणिक संकुलाचे भूमिपूजन शनिवारी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. सोबतच अहेरी येथील महिला रुग्णालयाचे उद्घाटन देखील मुख्यमंत्री करणार आहेत.

महाराष्ट्र, तेलंगणा आणि छत्तीसगड या तीन राज्यांच्या सीमेवर वसलेला हा भाग आरोग्य आणि उच्च शिक्षणाच्या सुविधांपासून वर्षानुवर्षे वंचित होता. साध्या शस्त्रक्रियेसाठी किंवा प्रसूतीसाठीही येथील नागरिकांना २५० ते ४०० किलोमीटर दूरवर असलेल्या हैदराबाद, नागपूर, चंद्रपूर किंवा गडचिरोली येथे जावे लागत होते. वेळेवर उपचार न मिळाल्याने अनेकांना प्राण गमावावे लागले. या नव्या प्रकल्पामुळे ही परवड थांबणार आहे.

२६४ एकर जागेवर साकारत असलेल्या या संकुलात पुण्यातील रुबी रुग्णालयाच्या



धर्तीवर ३०० खाटांचे अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारले जाणार आहे. यात बाह्यरुग्ण विभाग, अस्थिरोग, कर्करोग उपचार तसेच विविध प्रकारच्या जटिल शस्त्रक्रियांची सोय उपलब्ध होईल. सरकारच्या विविध आरोग्य योजनांचा लाभही येथे घेता येणार आहे.

याच संकुलात वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, दंत महाविद्यालय आणि नर्सिंग कॉलेजसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध होणार आहे. या शैक्षणिक संकुलाचे वैशिष्ट्य म्हणजे, यात आदिवासी विद्यार्थ्यांना ७५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत. तसेच, स्पर्धा परीक्षांची तयारी करणा?या विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वाचनालय, मोफत मार्गदर्शन आणि वसतिगृहाची व्यवस्थाही केली जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणाऱ्या या भूमिपूजन कार्यक्रमास राणा सूर्यवंशी यांच्यासह रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. परवेझ ग्रँट हेदेखील उपस्थित राहणार आहेत. या प्रकल्पामुळे केवळ सिरोंचाच नव्हे, तर लगतच्या छत्तीसगड आणि तेलंगणातील सीमावर्ती भागातील आदिवासी जनतेच्या जीवनात आरोग्य आणि शिक्षणाच्या बाबतीत मोठी कलाटणी मिळण्याची अपेक्षा या माध्यमातून व्यक्त केली जात आहे.

### आरोपांवर चर्चा नको....

# चौकशी होऊ द्या!

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची स्पष्टोक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :



पुण्यातील मुंढवा परिसरातील ४० एकर जमिनीच्या व्यवहारावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीशी संबंधित या व्यवहारात शासनाच्या मुद्रांक शुल्कात मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे.

सह जिल्हा निबंधक संतोष हिंगाणे यांनी बावधन पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, या प्रकरणात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये जमीन विक्रेता शीतल तेजवानी, अमेडिया कंपनीचा भागीदार दिग्विजय पाटील आणि सह दुय्यम निबंधक रविंद्र तारू यांचा समावेश आहे.

या प्रकरणात पार्थ पवारांचे नाव तक्रारीत नसल्याने विरोधकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वाचे विधान करत, चौकशी सुरू आहे आणि रिपोर्ट आल्यानंतरच पुढील कारवाई होईल, असं स्पष्ट केलं आहे.

बावनकुळे यांनी स्पष्ट केलं की, प्राथमिक चौकशीत जे लिहून देणारे, सही करणारे आणि नोंदणी प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होते, त्यांच्याविरुद्धच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पार्थ पवारांचे नाव प्राथमिक टप्प्यात आढळलेलं नाही. मात्र, पुढील चौकशीत कोणतेही नवीन पुरावे समोर आल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल.

त्यांनी सांगितलं की, खरेदी-विक्रीच्या वेळी कंपनीच्या दस्तऐवजांवर कोणी सही केली, व्यवहाराचे कागद कोणी तयार केले आणि नोंदणी प्रक्रियेत कोण सहभागी झाले, याची नोंद शासनाकडे आहे. अजितदादांनीही या प्रकरणावर स्पष्टीकरण दिलं आहे. त्यामुळे आरोपांवर चर्चा करण्याऐवजी चौकशीचा निकाल येऊ द्यावा, असं बावनकुळे म्हणाले.

बावनकुळे यांनी सांगितलं की, प्राथमिक अहवालानुसार जे दोषी दिसले त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील चौकशी खारगे समिती करत आहे. विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठित करण्यात आली असून, ती महिनाभरात अहवाल सादर करेल. महसूल विभागाने निलंबनाची कारवाई केली असून, पुढील टप्प्यात सखोल तपास होणार आहे. सर्व पुरावे आणि व्यवहारातील प्रत्येक टप्प्याची चौकशी केली जाईल. दोषींना वाचवण्याचा प्रश्नच येत नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

## वाघाने वनरक्षकावर हल्ला केल्याचा व्हिडिओ खोटा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी भागात एका अतिथीगृहाजवळ वाघाने वनरक्षकावर हल्ला केल्याचा एक व्हिडिओ सध्या इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फिरत आहे. हा व्हिडिओ पूर्णपणे बनावट असल्याचे आढळून आले आहे. हा व्हिडिओ कृत्रीम बुद्धीमत्तेचा म्हणजे एआय तंत्रांचा वापर करून तो तयार करण्यात आला आहे.

चंद्रपूर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी पडताळणी केल्यानंतर, ब्रह्मपुरी परिसरात किंवा राज्यातील कोणत्याही वन अतिथीगृहाजवळ अशी कोणतीही घटना घडलेली नाही याची पुष्टी झाली आहे. हा व्हिडिओ डिजिटली हाताळणी करून तयार करण्यात आला आहे, जो वेगवेगळ्या ऑनलाइन फुटेजचे मिश्रण करून आणि जनतेची दिशाभूल करण्यासाठी पार्श्वभूमी बदलून तयार केला आहे.

नागरिकांनी असे बनावट व्हिडिओ शेअर करु नयेत. तसेच अशा व्हिडिओंवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन वनखात्याने केले आहे. अशी खोटी माहिती प्रसारित केल्याने अनावश्यक दहशत निर्माण होते आणि वन्यजीवांच्या वर्तनाबद्दल चुकीची माहिती पसरते. फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स अशा समाजमाध्यमावर सध्या एक व्हिडिओ झपाट्याने व्हायरल होत आहे.

> अतिथीगृहाजवळ वनरक्षक आहे. तेथे एक वाघ येतो आणि वनरक्षकावर हल्ला करुन त्याला ओढत घेऊन जातो. हा व्हिडिओ सुरुवातीला खराच वाटतो आणि त्यामुळेच शहानिशा न करता समाजामाध्यमांवर व्हिडिओची कोणतीही सत्त्यता न तपासता तो झपाट्याने प्रसारित करण्यात आला. या प्रकारामुळे वनखातेही हैराण झाले आहे. सायबर कायद्यांतर्गत औपचारिक तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.
>
> **एम. एस. रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)**

## आगार व्यवस्थापक निलंबीत

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ७ :
एसटी महामंडळातील परतवाडा येथील आगार व्यवस्थापक मद्यपान करून कामात कचुराई करायचा. त्याला प्रादेशिक व्यवस्थापकांनी निलंबित केले आहे.

कर्तव्यावर असताना मद्यप्राशन करून कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल अमरावती विभागातील परतवाडा आगार व्यवस्थापक जीवन दत्तात्रय वानखेडे यांना एसटी महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापकांनी निलंबित केले आहे. याबरोबरच त्यांची विभागीय चौकशी करून त्यात ते दोषी आढळल्यास त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई सुरू करण्यात येणार आहे.

आगार व्यवस्थापक मद्यप्राशन करून आपल्या शासकीय निवासस्थानी अत्याव्यस्थ अवस्थेत पडले आहेत. अशी माहिती सुरक्षा व दक्षता विभागाला कळवली होती. त्यानुसार तेथे एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाने छापा टाकला असता उपरोक्त तक्रारीमध्ये तथ्य आढळले. त्याआधारे वानखेडे यांनी निलंबीत करण्यात आले आहे.

## माजी नगराध्यक्ष पडोळेंचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ७ :



भाजप नेत्या कल्याणी भुरे यांनी काही दिवसांपूर्वी भाजपला सोडचिठ्ठी दिल्यानंतर आता भाजपचे माजी नगराध्यक्ष आणि माजी भाजप जिल्हाध्यक्ष प्रदीप पडोळे यांनीही त्यांच्या संघटनात्मक पदाचा राजीनामा दिला आहे.

संघटनेत काम करताना कधी जातीचे राजकारण मी केले. पक्षासाठी प्रामाणिकपणे काम केले. पण आज जातीयवाद करीत असल्याचा आरोप पक्षातीलच काही लोक करीत आहे. भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा मी जिल्हाध्यक्षांकडे पाठवला असून यापुढे पक्षाचे कोणतेही पद आणि जबाबदारी मी स्वीकारणार नाही. आगामी नगरपालिका अध्यक्षपदाची निवडणूक सुद्धा लढवणार नाही, असे पडोळे यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले.



## गारठा वाढला, राज्यभरात थंडीला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
नोव्हेंबरचा पहिला आठवडा संपत असताना अजूनही थंडीचा प्रभाव जाणवला नाही. मात्र, रात्रीचा म्हणजेच किमान तापमानाचा पारा आता घसरायला लागला आहे.

त्यामुळे आठ नोव्हेंबरपासून कमाल व किमान तापमानात २ ते ३ अंशाची घसरण होईल व बहुप्रतिक्षित अशा गुलाबी थंडी सुरुवात होईल असा अंदाज, भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातही थंडीला सुरवात होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

उत्तर भारतात शक्तीशाली पश्चिमी झंजावातातून हंगामाला साजेशी बर्फवृष्टी होत आहे. मंगळवारच्या हलक्या सरीनंतर दोन दिवसांपासून विदर्भाचे आकाश निरभ्र झाले आहे. दोन दिवसानंतर महाराष्ट्रातही आकाश निरभ्र होईल असा अंदाज आहे. समुद्रसपाटीपासून दीड किलोमीटर उंचीपर्यंत उत्तर भारतातून ताशी दहा किलोमीटर वेगाने उत्तरी वाऱ्यांना सध्या कोणताही अडथळा जाणवत नसला तरी विदभार्तील पारा आणखी घसरेल.

११ नोव्हेंबर पासुन पहाटेच्या किमान तापमानात तीन ते चार अंश सेल्सिअसने घसरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. सध्या विदर्भाचे दिवसाचे तापमान ३० ते ३३ अंशाच्या सरासरीत आहे. नागपूरच्या कमाल तापमानात अंशतः वाढ झाली आहे, तर किमान तापमानात घट झाली आहे. मात्र अद्याप रात्रीचे तापमान सरासरीच्या वर आहे. येत्या दोन दिवसात ते आणखी खाली येईल, असा अंदाज आहे.

नोव्हेंबरच्या उत्तरार्धात म्हणजेच १७, १८ तारखेपासून मात्र थंडीत वाढ होईल. नोव्हेंबर महिन्यातील किमान तापमान १० ते ११ अंशापर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान संपूर्ण विदर्भात आकाश निरभ्र असून येत्या काळात पावसाची कोणतीही शक्यता जाणवत नसल्याचे मत हवामान अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. अवकाळी पावसामुळे ऑक्टोबर हीटचे चटके यंदा जाणवलेच नाहीत. नागरिकांना नोव्हेंबर महिन्यात थंडी अनुभवता येईल, असा अंदाज आहे.

## वन्यजीव तस्करीबाबत जनजागृती आवश्यक

लोकरंग

कधी हत्तीच्या उंची किमतीला विकल्या जाणाऱ्या दातांसाठी, तर कधी वाघाच्या कातडीसाठी, कधी गेंड्यांच्या महाग सोंडेसाठी अशा अनेक वन्य प्राण्यांची परदेशातून भारतात अवैधरित्या तस्करी केली जाते. परंतु भरमसाठ किंमत देऊन या वन्यजीवांना विकत घेणारे तस्कर कोण? त्यांच्यावर कारवाई झाली का? याबाबत मात्र जनसामान्य लोक अनभिज्ञ असतात. अशा वन्यजीवांची तस्करी करणाऱ्या तस्करांची माहिती लोकांसमोर येणं गरजेचं आहे. त्यासाठीच शासकीय स्तरावर काय करता येणं शक्य आहे? या संदर्भात कॉर्बेट फाउंडेशनचे संचालक आणि वन्यजीव कार्यकर्ते केदार गोरे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**जगभरात वन्यजीवांची तस्करीवर निर्बंध आणणारा कायदा केंव्हा झाला? भारतात या कायद्याची अमलबजावणी केंव्हा झाली?**

■ वन्यजीवांच्या व्यापाराची सुरुवात सुमारे ५,५०० वर्षांपूर्वी सुरू झाली असावी असा अंदाज आहे. वाघांची कातडी, गेंड्यांची शिंगे, हस्तिदंत, हरणांची शिंगं, ध्रुवीय अस्वलांची कातडी... अशासाठी शेकडो प्राण्यांना मारून माणूस आपला उदरनिर्वाह करीत होता. भूक भागविणे, थंडीपासून संरक्षण अशा गरजांपासून सुरू झालेल्या शिकारी हळूहळू ळूहळू हौस मजेसाठी होऊ लागल्या. गेल्या काही शतकांपासून मात्र शिकारींचे रूपांतर एका महाभयंकर अवैध व्यवसायात झाले.

१९००च्या दशकापर्यंत या अनिर्बंध शिकारींमुळे जागतिक स्तरांवर वन्यजीवांची संख्या झपाट्याने घटली. वुली मॅमथ, डोडो पक्षी, टास्मानिअन टायगर, पट्टेरी वाघांच्या काही उपप्रजाती, पॅसेंजर कबुतर यांसारख्या काही प्रजाती नामशेषही झाल्या. अवैध शिकारींचा धोका ओळखून आय.यू.सी.एन. संस्थेच्या मध्यस्थीने १९६३ साली एका जागतिक स्तरावर अंमलबजावणी करता येईल अशा कराराविषयी चर्चा सुरू झाली व १९७५ साली 'सायटिस' (उक्ळएर) या नावाने जगभरातील वन्यजीवांना एका सुरक्षा कवच मिळाले.

या करार परिशिष्टांमध्ये सूचीबद्ध असलेल्या ३८,००० हून अधिक प्राणी व वनस्पती प्रजातींसाठी परवाने आणि परवान्यांद्वारे व्यापाराचे नियमन करता येऊ लागले. आजच्या घडीला भारतासह १८४ देशांनी या करारावर स्वाक्ष?या केल्या आहेत. सायटिस असूनही २०२५ साली आय.यू.सी.एन. ने केलेल्या १,६९,००० वन्यजीव प्रजातींचे मूल्यांकनातून ४७,००० प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, ही धक्कादायक बाब समोर आली. भारतात वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ साली लागू झाला व भारतात नैसर्गिकरीत्या आढळणाऱ्या प्राणिविश्वातील काही महत्त्वाच्या प्रजातींचा समावेश करून त्यांच्या शिकारींवर बंदी आणली

**वन्यजीवांची अवैध तस्करी करणाऱ्यांवर काय कारवाई होते?**

■ वन्यजीवांना अवैधरीत्या भारतात आणणाऱ्यांना एक अटक झाल्याच्या बातम्या येतात परंतु, पुढे चौकशीत या काय माहिती मिळाली, भरमसाठ किंमत मोजून डे, वन्यजीव विकत घेणारे कोण होते, त्यांच्यावर, कार्यवाही झाली किंवा नाही व याची काय करणे होती या याबाबत काही अपवाद वगळता कसलीच माहिती पुढे येत नाही. या व्यवसायात मध्यस्थ म्हणून अनेक टोळ्या काम करतात. या टोळ्यांमार्फत मग वन्यजीव ५ खरेदी करणाऱ्यांकडे पाठविले जातात. सीमाशुल्क बत विभाग व वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो यांच्या संकेतस्थळांवर वन्यजीव तस्करीच्या घटनांची संकलीत माहिती दिसत नाही. २०१९ साली इंटरपोल आणि जागतिक सीमाशुल्क संघटना यांनी संयुक्तपणे १०९ एक देशांमधून १,८२८ प्रकरणांत ५४५ किलो हस्तिदंत, णी १३०० किलो खवलेमांजरांचे खवले, ९,७७७ जिवंत च्या कासवे, १,७०० किलो वनस्पती, ४,३०४ जिवंत च्या पक्षी, ९,८२० समुद्रीजीव, १,४२२ जिवंत ली साप-पाली, आणि हजारो मेट्रिक टन इमारती लाकूड जप्त केले. या प्रकरणांमध्ये ५८२ लोकांना अटक झाली

**वन्यजीवांची अवैध तस्करी रोखण्यासाठी काय प्रयत्न होणे गरजेचे आहेत?**

■ शासकीय प्रयत्नातून सीमाशुल्क विभाग आणि वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरोच्या माध्यमातून अशा वन्यजीव तस्करांची माहिती यांच्या संकेत स्थळावर देऊन या तस्करी विरोधात प्रभावी जनजागृती करणे आवशयक आहे. शिवाय अशा प्रकारे भारतीयांनी कोणत्याही वन्यजीवांचे मांस खाण्यास नकार देऊन असे प्रयत्न रोखयला हवेत. यामुळे परदेशातून भारत्तात होणारी वन्यजीवांची तस्करी रोखता येईल आणि या वन्यजीवांच्या तस्करीतून मिळणाऱ्या पैशातून दहशतवादावर देखील नियंत्रण आणता येईल. ■ ■ ■

## इटालियन कंपनी फ्रिगोसिस्टमची भारतात उत्पादन प्लांटसाठी १ दशलक्ष युरोची गुंतवणूक



फ्रिगोसिस्टम एस.आर.एल. या इटलीमधील उच्च कार्यक्षम औद्योगिक चिलर्स व थर्मल कंट्रोल सिस्टमच्या आघाडीच्या उत्पादक कंपनीने त्यांच्या देशाबाहेर पहिल्या उत्पादन प्लांटच्या भव्य उद्घाटनाची घोषणा केली.

भारतातील चेन्नई येथे स्थित नवीन प्लांटसाठी १ दशलक्ष युरोची पायाभूत गुंतवणूक करण्यात आली आहे आणि हा प्लांट गतीशील आशियाई बाजारपेठेत कंपनीच्या जागतिक उपस्थितीच्या महत्त्वपूर्ण विस्तारीकरणाला सादर करतो. तसेच अधिक गुंतवणूकीसह आगामी काळात विस्तार करण्याची कंपनीची योजना आहे.

नवीन कंपनी फ्रिगोसिस्टम इंडिया प्रा. लि. उत्पादन, सेवा आणि तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठी प्रादेशिक केंद्र असेल. ही नवीन कंपनी प्रगत औद्योगिक चिलर्स, थर्मारेग्युलेटर्स आणि ॲडियाबॅटिक कूलिंग एनर्जी (एसीई) सिस्टम्स उत्पादित करण्यासाठी सज्ज आहे, ज्या विशेषतः भारतातील व आग्नेय आशियामधील बाजारपेठांच्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण ?यात येतील. फ्रिगोसिस्टमचा दीर्घकालीन वारसा आहे, जेथे १९७० पासून प्लास्टिक प्रक्रिया, ऐरोनॉटिक्स (वैमानिकी), पॅकेजिंग आणि धातू उत्पादन यांसारख्या महत्त्वपूर्ण उद्योगांना सेवा देत आहे.

धोरणात्मक दृष्टिकोन आणि स्थानिक प्रभाव कंपनी या पुढाकाराकडे त्यांच्या धोरणात्मक आराखड्यामधील महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहते, ज्याचा डिलिव्हरी गती वाढवण्याचा आणि संपूर्ण खंडामध्ये स्थानिक सोल्यूशन्स देण्याचा मनसुबा आहे. उत्पादन केंद्र म्हणून सेवा देण्याव्यतिरिक्त चेन्नईमधील प्लांट सर्विस अँड ट्रेनिंग हब म्हणून कार्य करेल, ज्यासह दक्षिण आशियामधील फ्रिगोसिस्टमचे विक्री-पश्चात्त सपोर्ट नेटवर्क अधिक मजबूत होईल. या गुंतवणूकीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार देखील निर्माण होतील

■ ■ ■

## अमरावतीची शिवटेकडी



अमरावतीमध्ये अनेक पर्यटन स्थळ आहेत. त्यापैकी एक असलेलं म्हणजे शिव टेकडी ज्याला माल टेकडी म्हणूनही संबोधल्या जाते.

शिव टेकडी येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य असा पुतळा आहे. त्याचबरोबर पुतळ्याच्या बाजूला दर्गाह सुद्धा आहे. या ठिकाणी अनेक पर्यटक भेटी देतात. या ठिकाणी अजूनही बांधकाम सुरू आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवन त्या ठिकाणी दाखवण्यात येईल अशा प्रकारचे बांधकाम त्या ठिकाणी सुरू आहे. अमरावती मेन बस स्टॉप वरून अगदी ५०० मीटर अंतरावर शिव टेकडी आहे. शिव टेकडी लाच माल टेकडी म्हणूनही संबोधल्या जाते. शिव टेकडी येथे प्रवेश करताच तुम्हाला अनेक फुलं हारांची दुकाने दिसतील.

त्यानंतर समोर गेलं की, तुम्हाला एक चढता रस्ता दिसेल. तो रस्ता पार करत असताना सर्वत्र हिरवेगार निसर्गरम्य वातावरण आणि पक्षांचा चिवचिवाट ऐकायला येईल. त्यानंतर पायऱ्या दिसतील तेथून तुम्हाला महाराजांच्या पुतळ्याकडे जाता येईल. छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य असा पुतळा तुम्हाला बघायला मिळेल. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## ६०० कोटींचा टायगर सफारी प्रकल्प चंद्रपूर जिल्ह्यात साकारणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
चंद्रपूर-मूल मार्गावरील वन अकादमी जवळील १७१ हेक्टर क्षेत्रात ६०० कोटीतून प्रस्तावित टायगर सफारी प्रकल्पाला लवकरच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी मिळणार आहे, अशी माहिती आमदार किशोर जोरगेवार यांनी दिली. दिल्ली येथे केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांसोबतच्या बैठकीत या प्रकल्पाबाबत सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे आता चंद्रपूर टायगर सफारीच्या कामाला गती मिळणार आहे.

दिल्ली येथील केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीला भारत सरकारचे सदस्य सचिव डॉ. व्ही. क्लेमेंट बेन, राज्य वन्यजीव प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास रेड्डी, एफडीसीएम गोरवाडा प्राणी संग्रहालय लिमिटेड नागपूरचे सीईओ चंद्रशेखर बाला उपस्थित होते. आमदार किशोर जोरगेवार यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

याआधी त्यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत हा विषय मांडला होता. नाईक यांनीही प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद देत निधी वितरण प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर आमदार जोरगेवार यांनी नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयाची पाहणी करून प्रकल्पाच्या आराखड्याची माहिती घेतली होती.

या प्रकल्पात ऑस्ट्रेलियन, साउथ अमेरिकन, साउथ आफ्रिकन आणि इंडियन ट्रेल अशा विविध थीमवर आधारित प्राणीदर्शन झोन असतील. पर्यटकांना येथे कांगारू, जग्वार, माकडे, कॅपीबारा, विविध रंगीबेरंगी पक्षी तसेच देशी आणि विदेशी प्राणी पाहता येणार आहेत. याशिवाय ४४ हेक्टर क्षेत्रात वाहन सफारी, २० एकर क्षेत्रात चिल्ड्रन पार्क आणि पर्यटकांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

## गोंडवानातील पीएचडी प्रक्रिया वादात

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ७ :



गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नुकतीच पार पडलेली आचार्य पदवीची (पीएच.डी.) मौखिक परीक्षा विद्यापीठाच्याच अध्यादेशाचे उल्लंघन करून घेण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

विद्यापीठाच्या या बेकायदेशीर प्रक्रियेवर आक्षेप घेणाऱ्या अधिसभा (सिनेट) सदस्यालाच प्रशासनाकडून कारवाईची धमकी देण्यात आली. हा प्रकार सिनेट सदस्याचा हक्कभंग असल्याचा ठपका ठेवत, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी गडचिरोलीचे आमदार तथा सिनेट सदस्य डॉ. मिलिंद नरोटे यांच्यासह, सिनेट सदस्यांनी केली आहे.

२९ ऑगस्ट २०२५ रोजी गोंडवाना विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्रांतर्गत (समाजकार्य विभाग) दोन संशोधक विद्यार्थ्यांची पीएच.डी. मौखिक परीक्षा घेण्यात आली. ही प्रक्रिया विद्यापीठाच्या अध्यादेश क्रमांक ८७ ऑफ २०१७ नुसार पार पाडणे कायदेशीररित्या बंधनकारक होते. मात्र, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांनी या अध्यादेशाला डावलून बेकायदेशीर पद्धतीने ही अंतिम परीक्षा पार पाडली, असा आरोप सिनेट सदस्यांनी केला आहे.

यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते, ही बाब सिनेट सदस्य डॉ. रूपेंद्रकुमार गौर यांनी तात्काळ कुलगुरू व प्र-कुलगुरू यांच्या निदर्शनास लेखी निवेदनाद्वारे आणून दिली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार, सिनेट हे विद्यापीठाचे सर्वोच्च वैधानिक प्राधिकरण असून, विद्यापीठाचा कारभार नियमांनुसार चालतो की नाही हे पाहणे व त्यावर प्रश्न विचारणे हा सिनेट सदस्यांचा वैधानिक अधिकार आहे.

मात्र, स्वतःच्या त्रुटी मान्य करण्याऐवजी, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांनी उलट डॉ. गौर यांनाच कलम ४८(४) अंतर्गत कारवाईची धमकी देत स्पष्टीकरण मागितले. विद्यापीठातील गैरव्यवहार समोर आणणाऱ्या लोकप्रतिनिधीलाच धमकी देणे हा अधिसभेच्या अधिकारातील थेट हस्तक्षेप असून हा संस्थात्मक अवमान आहे. असे सदस्यांचे म्हणणे आहे.

प्रशासनाने या सर्व त्रुटींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून संबंधित पीएच.डी. प्रकरणाचा निकालही घोषित केला आहे. हा प्रकार गंभीर असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि जलद चौकशी करून, दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, डॉ. पी. अरुणाप्रकाश, प्रा. धर्मेंद्र मुनघाटे, सतीश चिचघरे, प्रा. स्वरूप तारगे, किरणताई गजपुरे, विजय घरत आणि डॉ. रूपेंद्रकुमार गौर यांनी केली आहे.